बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३१५ ■ मंगळवार १८ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णावर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
दि.१७ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.
संपर्क :- डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

बिहारच्या चेंगराचेंगरीत सात ठार

उज्जैनच्या महाकालेश्वरच्या परिसरात चेंगराचेंगरी तेरा जखमी, दर्शनास चाळीस हजार भाविक रांगेत

उज्जैन, दि.१७- येथील महाकालेश्वर मंदिर परिसरात चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली. विजेचा धक्का बसल्याच्या अफवा पसरल्या. ज्यामुळे लोक एकमेकांवर पडले. वाढलेल्या दाबामुळे १३ जणांची प्रकृती बिघडली. पोलिसांच्या माहितीनुसार, भगवान नागचंद्रेश्वराच्या दर्शनासाठी अंदाजे ४० हजार भाविक रांगेत उभे होते. आतापर्यंत अंदाजे साडे पाच लाख भाविकांनी मंदिराला भेट दिली आहे. हे मंदिर महाकाल मंदिराच्या तिसऱ्या मजल्यावर असून ते फक्त नागपंचमीला उघडले जाते. जखमी भाविकांना उज्जैन जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलीस आणि प्रशासन घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. तथापि, जखमींनी गर्दी व्यवस्थापनात निष्काळजीपणा आणि मदत मिळण्यास विलंब झाल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, बिहार मधील लखीसराय येथील मंदिरात झालेल्या भीषण चेंगराचेंगरीत सात महिलांचा मृत्यू झाला. बारापेक्षा अधिक लोक जखमी झाल्याचे वृत्त आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. ही घटना अशोकधाम स्टेशन ते मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर घडली.

मदत मिळण्यास विलंब झाला

चेंगराचेंगरीत जखमी झालेल्या सागरने सांगितले, या घटनेपूर्वी मी महाकाल मंदिरात दर्शनासाठी रांगेत उभा होतो. सात ते आठ तासांनंतर मी हरसिद्धी चौकात पोहोचलो. आम्हाला तिथे दोन तास उभे ठेवण्यात आले. गर्दी वाढत होती आणि आरतीची वेळ असल्याने आम्हाला तिथे थांबवण्यात आले. सागरच्या म्हणण्यानुसार, बॅरिकेड्स अचानक उघडले. ज्यामुळे चेंगराचेंगरी झाली. तंबू कोसळला आणि इतर सर्व बॅरिकेड्सही कोसळले. माझे दोन्ही पाय बॅरिकेड्खाली अडकले. माझ्या एका पायाला फ्रॅक्चर झाले आहे. मंदिरातील व्यवस्था खूपच खराब होती. मला कोणीही मदत केली नाही. फक्त एक व्यक्ती आली आणि तिने मला वैद्यकीय शिबिरात दाखल करून घेतले. (पान ४ वर)

विध्वंसक कृत्य करण्यापुर्वी देशात २५३ जण अटकेत

नवी दिल्ली, दि. १७ : स्वातंत्र्य दिनाच्या आधी सुरक्षा यंत्रणांनी पाकिस्तानच्या आयएसआय समर्पित शहजाद भट्टी नेटवर्क विरोधात कारवाई केली. या कारवाईत चौदा राज्यांमधून २५३ जणांना ताब्यात घेण्यात आले. या नेटवर्कविरोधात आतापर्यंत ऐंशीपेक्षा अधिक एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. तर दोनशेपेक्षा अधिक जणांना अटक करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले की, मोदी सरकारने स्वातंत्र्यदिनाच्या आसपास देशात दहशतवादी आणि विध्वंसक कारवाया करण्याचा कट उधळून लावला. मोदी सरकारने आयएसआय-समर्पित दहशतवादी गट शहजाद भट्टी नेटवर्क स्वातंत्र्य दिनाच्या आधी उद्ध्वस्त केला. यात दोनशेहून अधिक दहशतवाद्यांना अटक करून त्यांचे (पान ४ वर)

सहा लाखांचे दागिने लंपास करणाऱ्या चौघांना अटक शिरपूर पोलिसांकडून एकासह तीन महिलांना अटक

शिरपूर दि.१७ (का. प्र.): येथील नंदुरबारकर सराफ या दुकानातून सहा लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरल्याच्या संशयावरून पोलिसांनी चार जणांना अटक केली. सर्वच संशयित मालेगाव येथील रहिवासी असून त्यांनी मुंब्रा जि. ठाणे येथे विकलेला चोरीचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला.

सराफ व्यावसायिक सुरेंद्र सम्मुखलाल सराफ यांच्या महात्मा गांधी कॉम्प्लेक्स येथील दुकानातून सहा लाख रुपयांची सोन्याची कर्णभूषणे असलेला बॉक्स पाच ऑगस्टला चोरीस गेला होता. सराफ यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले असता तीन महिलांनी बुरखा घालून ही चोरी केल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले होते.

गुन्ह्याचा तपास करताना शिरपूर शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले. वाहनाच्या क्रमांकाच्या आधारे चोरी करणाऱ्या महिलांपर्यंत पोलीस पोहोचले. तपासादरम्यान पोलिसांनी अन्नू उर्फ साजिदा बशीर खान (वय ३६, रा. कमालपुरा, मालेगाव, जि. नाशिक), मन्नू उर्फ मुन्नराज शेख गफ्फार (वय२३), रोजवाना जाकीर शेख (वय ३५, दोन्ही रा. विजय नगर, इकबाल धाब्याजवळ, मालेगाव) आणि नदीम शेख गयासुद्दीन शेख (वय ४२, रा. अंबिका नगर, मालेगाव) यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी चोरलेले दागिने ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथील सराफा दुकानदारास विकल्याचे सांगितल्याने पोलिसांनी तेथे जाऊन चौकशी केली. त्यानंतर चोरीच्या दागिन्यांची विक्री झाल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी इंदरचंद मेहता याच्याकडून वितळलेले दागिने जप्त केले.

पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये सुमारे ३ लाख रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची मारुती स्विफ्ट डिझायर कार, सुमारे २० हजार रुपये किमतीचे रेडमी कंपनीचे दोन अँड्रॉइड मोबाईल आणि सुमारे ६ लाख रुपये किमतीचे ४०.१२० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, असा एकूण सुमारे ९ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

चारही आरोपींना अटक करून त्यांना पोलीस (पान ४ वर)

सोलर कंपनीतुन केबल चोरणाऱ्या तिघांना निजामपूर पोलिसांनी शिताफीने केले गजाआड

धुळे, दि.१७- भडगाव (ता. साक्री) शिवारातील सोलर कंपनीतुन केबल चोरून येणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली. केबलसह लाखाचा मुद्देमाल जप्त केला असून चोरट्यांची टोळी निजामपूर पोलिसांनी निष्पन्न केली.

निजामपूर पोलीस ठाणे हद्दीतील भडगाव शिवारातील ह्युबोन (फोर पार्टनर) सोलर कंपनीच्या ईन्व्हर्टर मधुन तोडफोड करुन चोरटयांनी ८६ हजार रुपयांची कॉपर केबल चोरुन नेली. रविवारी मध्यरात्री चोरीचा प्रकार घडला. निजामपुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. हाय्यक पोलीस निरीक्षक किरण बर्गे यांना गोपनिय माहिती मिळाली. त्यानुसार सोनु तात्या पवार (वय २०), लखन देविदास सोनवणे (२६), अनिल भावराव ठाकरे (२२, सर्व रा. भडगाव ता. साक्री) यांना ताब्यात घेत सखोल विचारपुस केली असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिली. त्यांच्याकडून ८६ हजारांची केबल, २० (पान ४ वर)

दीड वर्षांच्या चिमुरड्यावर मोकाट कुत्र्यांचा हल्ला

धुळे, दि.१७- येथील देवपूर परिसरातील भुजल कॉलनीत मोकाट कुत्र्यांनी घराबाहेर दीड वर्षाच्या बालकावर हल्ला केला. त्यात बालक गंभीर जखमी झाला असून त्याला खासगी रुग्णालयात दाखल केले. दक्ष गिरीश सुर्यवंशी असे बालकाचे नाव आहे.

आज सकाळी तो घरासमोर मोकळ्या जागेत खेळतांना मोकाट कुत्र्यांच्या टोळक्याने त्याच्यावर हल्ला केला. दक्षच्या चेहरा, चेहऱ्यावर गंभीर जखमा झाल्या असून एक गालही पूर्णपणे फाटला आहे. बालकाच्या रडण्याचा आवाज ऐकून कुटुंबीयांसह परिसरातील काहींनी धाव घेत बालकाची सुटका केली. त्याला खासगी रुग्णालयात दाखल केले.

मुकेश आर.पटेल सीबीएसई निवासी स्कूलमध्ये स्व.तपनभाई पटेल जयंतीनिमित्त अभिवादन

शिरपूर, दि.१७- श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई संचलित तांडे, ता. शिरपूर येथील मुकेश आर. पटेल निवासी सीबीएसई स्कूलमध्ये स्व. तपनभाई मुकेशभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. शाळेच्या परिसरात आयोजित कार्यक्रमात स्व. तपनभाई पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री विलेपार्ले केळवणी मंडळ तत्कालीन ट्रस्टी, शिरपूर टेक्सटाईल पार्क कार्यकारी संचालक स्व. तपनभाई मुकेशभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्राचार्या श्रीमती मंजु सिंह यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांनी स्व. तपनभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली.

यावेळी प्राचार्या श्रीमती मंजु सिंह यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्व. तपनभाई पटेल यांच्या जीवनकार्याची आणि समाजसेवेतील योगदानाची माहिती दिली. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करताना शिक्षणाला (पान ४ वर)

कानबाई माता विसर्जन मिरवणुकीत जल्लोष

नंदुरबार, दि.१७(प्रतिनिधी)- नंदुरबार शहरात कानबाई माता विसर्जन मिरवणुकीचा उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात समारोप झाला. शहरातील विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक मिरवणुकीत सहभागी झाले होते. साक्री नाका परिसरात कानबाई माता विसर्जन मिरवणुकीसाठी भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.जगतापवाडी परिसरात मिरवणुकीदरम्यान भाविकांनी पाण्याचे फवारे मारत जल्लोष केला. यावेळी तरुणाईसह महिला व बालकांनीही उत्साहात सहभाग घेतला. माळीवाडा परिसरातही कानुबाई माता विसर्जन मिरवणुकीत भाविकांनी सहभाग नोंदविला.

हेंद्रुणला सर्पदंशाने वृद्धेचा मृत्यू

धुळे, दि.१७- हेंद्रूण (ता. धुळे) येथील वृद्धेला झोपेत असताना सर्पदंश होऊन तिचा मृत्यू झाला.लिलाबाई लक्ष्मण जगदाळे (वय ६४) असे त्यांचे नाव आहे. शनिवारी (दि.१५) रात्री दहाच्या सुमारास घरात झोपले होते. त्यांना हाताला सर्पदंश झाला. त्यांना खासगी वाहनाने श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. तेथे उपचार सुरु असतांना लिलाबाई जगदाळे यांचे निधन झाले. डॉ. बागुल यांनी मृत घोषीत केले. कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार मोहाडी उपनगर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

विजय चौधरी यांच्या भाजपातील हकालपट्टीनंतर नवीन राजकीय समिकरणांकडे लागले सर्वांचे लक्ष

नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी) - भाजपच्या माजी खासदार डॉ. हिना गावित यांच्याविरोधातील कथित वादग्रस्त ऑडिओ क्लिप प्रकरणी भाजपचे माजी महामंत्री विजय चौधरी यांच्यावर पक्षाने मोठी कारवाई केली आहे. पक्षाने चौधरी यांची प्राथमिक सदस्यत्वासह पक्षातील सर्व जबाबदाऱ्यांतून हकालपट्टी केल्याने नंदुरबारच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. यामुळे कोणती नवीन राजकीय समिकरणे तयार होतात ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

काही दिवसांपूर्वी डॉ. हिना गावित यांच्याविरोधातील कथित वादग्रस्त ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. या क्लिपमध्ये विजय चौधरी यांचा आवाज असल्याचा दावा करण्यात आला होता. या प्रकरणावरून राजकीय वातावरण तापले होते. त्यानंतर या प्रकरणाची गंभीर दखल घेत भाजपकडून चौधरी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली. पक्षाच्या कारवाईनुसार विजय चौधरी यांना पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वासह सर्व जबाबदाऱ्यांतून तात्काळ मुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे नंदुरबार भाजपमधील अंतर्गत राजकारणाला नवे वळण मिळाले आहे. या कारवाईनंतर नंदुरबार भाजपमधील अंतर्गत मतभेद आणि गटबाजी पुन्हा चर्चेत आली आहे. चौधरी यांच्या हकालपट्टीनंतर स्थानिक पातळीवर (पान ४ वर)

जैन ट्रस्टतर्फे गणवेश वाटप

धुळे, दि.१७- शहरातील स्व.रतिबाई मगनलाल जैन पब्लिक ट्रस्ट द्वारा कै.आनंदीबाई जावडेकर संस्कार मंदिरातील बालवर्ग व इयत्ता चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ट्रस्टद्वारे गणवेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्कार मंदिराचे अध्यक्ष सुधीर बडगुजर यांनी भुषविले. स्व.रतिबाई मगनलाल जैन पब्लिक ट्रस्टचे विश्वस्त प्रा.डॉ.न.म.जैन यांनी ट्रस्टच्या विविध उपक्रमांविषयी सविस्तर माहिती दिली. सुलोचना अग्रवाल यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. प्रा.दे.दी.डोंगरेंच्या हस्ते गणवेशाच्या रकमेचा ट्रस्टचा धनादेश सुशिल बंग यांना हस्तांतरीत केला.

कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा उपयोग करणार : जि.पो.अधीक्षक अश्विनी सानप

नंदुरबार, दि.१७ (प्रतिनिधी)- विज्ञान तंत्रज्ञानाच्या या युगात पोलीस दलाच्या विविध कार्यासाठी ड्रोन तंत्रज्ञान अतिशय उपयुक्त ठरणार असून रेवाज एनर्जी व सेरेब्रोस्पर्क या संस्थांच्या सहकार्याने नंदुरबार जिल्हा पोलीस दल जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी या तंत्रज्ञानाचा परिपूर्ण वापर करेल असे प्रतिपादन नंदुरबार जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांनी केले. एकलव्य विद्यालयात पोलीस दलासाठीच्या ड्रोन प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या.

महाराष्ट्र शासनाने मानवरहित प्रणाली धोरण राबविण्याचे निश्चित केले असून,या धोरणाच्या माध्यमातून विविध प्रकल्प राबवून मानवरहित प्रणालीचे जागतिक हब महाराष्ट्र व्हावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याअंतर्गत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ड्रोन तंत्रज्ञान सारखे तंत्रज्ञान वापरून वाहतुक नियंत्रण, (पान ४ वर)

अब्दूल खालिक फाउंडेशनतर्फे एआय संगणक प्रशिक्षण शिबिराला सुरुवात

शहादा, दि.१७ (प्रतिनिधी)- येथील अब्दूल खालिक एज्युकेशन अँड वेल्फेअर फाउंडेशनच्यावतीने तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने युवक व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय मोफत आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) व संगणक प्रशिक्षण शिबिराला उत्साहात सुरुवात झाली. ग्रामीण व निमशहरी भागातील युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान व डिजिटल कौशल्ये मिळावीत हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नंदुरबार जिल्हा क्रीडा अधिकारी संजय बलोलकर होते. प्रमुख अतिथी म्हणून धुळे जिल्हा क्रीडा अधिकारी स्वप्नील गोडे तसेच नंदुरबार जिल्हा क्रीडा विभागाचे महेंद्र काटे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून प्रशिक्षणाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रशिक्षणार्थींना या संधीचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. (पान ४ वर)

जिल्हा मध्य.सहकारी ग्राहक भांडार साडे चौदा लाखांचा नफा : अनिल मुंदडा

धुळे, १७- स्पर्धेच्या युगात आणि खाजगीकरण व मॉल संस्कृती असतानाही धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी ग्राहक घाऊक व किरकोळ भांडाराने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये चौदा लाख बासष्ट हजार तीनशे नव्याण्णव रुपयांचा व्यापारी नफा मिळवला आहे.

संस्थेची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १६ ऑगस्ट२०२६ रोजी सकाळी १० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात चेअरमन अनिल बन्सीलाल मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी सभेत अजेंड्यावरील सर्व विषयांवर सविस्तर चर्चा होऊन उपस्थित सभासदांनी सर्व विषयांना एकमताने मंजुरी दिली. संस्थेला १४.६२ लाखांचा नफा झाल्याची घोषणा चेअरमन मुंदडा यांनी केली. सभासदांशी संवाद साधताना चेअरमन मुंदडा म्हणाले की, सध्या स्पर्धात्मक युग आहे. सगळीकडे खाजगीकरण आणि मॉल संस्कृती आलेली असताना देखील आपण आपले ग्राहक भांडार मोठ्या जिकरीने सुरू ठेवले आहे. वर्षभरात आपल्या ग्राहक भांडारातून एकूण १ कोटी ८ लाख १७ हजार ८९५ रुपयांची विक्री झाली आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी जिल्हा उपनिबंधक मनोज चौधरी, उपनिबंधक मंगेशकुमार आर. शहा यांचे मार्गदर्शन तसेच महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशनचे सहकार्य लाभल्याचेही त्यांनी सांगितले. या सभेप्रसंगी संचालक देविदास माळी, विजय पिंगळे, शरदचंद्र देशपांडे, यतिश चौधरी, हेमंत पाटील, त्र्यंबक कापडे, शांताराम कुलकर्णी, दिनेश माळी, बद्रीविशाल व्यास, वसंत चौरे, दिना चौक, उषा काबरा यांच्यासह प्रभारी मॅनेजर जे.एच. देवरे, मधुकर महाजन, एल.एन. देवरे, नागराज पाटील, विक्रम थोरात, गंगाधर भडांगे, मुकेश चित्ते, सौ. छाया वाघ, मंगला मोरे यांच्यासह बहुसंख्य सभासद उपस्थित होते.

गिरीश महाजन व भरत गोगावले नाशिक व रायगडचे पालकमंत्री

मुंबई, दि.१७- अनेक वर्षांपासून रखडलेल्या रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्र्यांची नावं आज शासनाकडून जाहीर करण्यात आली आली आहेत. नाशिकमध्ये गिरीश महाजन तर रायगडमध्ये भरत गोगावले यांची पालकमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

महायुतीमधील तीनही पक्षांचे स्थानिक नेते आपापल्या जिल्ह्यांत आपले वर्चस्व राहावे आणि निधीचे नियंत्रण मिळावे यासाठी आक्रमक होते. यामुळे नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रिपदाच्या नियुक्त्यांवर स्थगिती देण्यात आली होती. मात्र, आज अखेर रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा प्रश्न सुटला आहे. रायगडच्या पालकमंत्रीपदासाठी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात रस्सीखेच सुरू होती. रायगडसाठी मंत्री आदिती तटकरे आणि मंत्री भरत गोगावले दोघेही इच्छुक (पान ४ वर)

शहर विद्रूपीकरण करणाऱ्या केबल्स हटविण्याची महापालिकेची मोहीम

धुळे, दि.१७- धुळे महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्ते तसेच विद्युत खांबांवर अस्ताव्यस्तपणे टाकण्यात आलेल्या नेट केबल, डिश केबल व अन्य दूरसंचार केबल्समुळे शहराचे विद्रूपीकरण होत आहे. याची गंभीर दखल घेत धुळे महानगरपालिकेने संबंधित खासगी कंपन्यांना या केबल्स हटविण्याबाबत जाहीर सूचना बजावली होती. मात्र संबंधितांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने आता महानगरपालिकेच्या यंत्रणेमार्फत अनधिकृत व अस्ताव्यस्त केबल्स हटविण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे.

या मोहिमेअंतर्गत संतोषी माता मंदिर ते विठ्ठल मंदिर या मार्गावरील विद्युत खांबांवर तसेच रस्त्यालगत अस्ताव्यस्तपणे टाकण्यात आलेल्या नेट केबल व डिश केबलच्या वायर काढून टाकण्यात आल्या. विद्युत अभियंता पराग ठाकरे यांच्या नियंत्रणाखाली ही कारवाई करण्यात येत असून, महानगरपालिका क्षेत्रातील विविध (पान ४ वर)

महिलेचा मृत्यू

धुळे, दि.१७- रजाणे ता.शिंदखेडा येथील दिव्या पंकज वाडीले (वय २५) रविवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास वाडीले हिला कुलरवर घराची चाबी ठेवतांना विजेचा धक्का बसला. तिला खासगी वाहनाने शिंदखेडा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. डॉक्टर घोषित केले. पोलिसात नोंद घेण्यात आली आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,41,200 रु.+3% GST
सोने- 24 K -1,54,100 रु.+3% GST
चांदी- 2,40,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

शहादा,दि.१७(का.प्र.)- खान्देशची कुलस्वामिनी मानल्या जाणाऱ्या कानबाई मातेच्या तीन दिवसीय अखंड उत्सवाची सोमवारी अत्यंत उत्साहपूर्ण व भक्तीमय वातावरणात विसर्जन मिरवणुकीने सांगता झाली. आधुनिक आणि धावपळीच्या जीवनशैलीतही कौटुंबिक जिव्हाळा, आपुलकी आणि पारंपारिकता टिकवून ठेवणारा हा उत्सव शहादा शहरासह परिसरात मोठ्या उत्साहात पार पडला.

शहादा येथे कानबाई माता उत्सव सवाद्य मिरवणूक; गोमाईत विसर्जन

खान्देशात श्रावण महिन्यातील दुसऱ्या रविवारी कानबाई मातेच्या मूर्तीची स्थापना करण्याची प्राचीन परंपरा आहे. या उत्सवाची सुरुवात शनिवारी भाजी-भाकरीचा नैवेद्य दाखवून आणि कौटुंबिक पूजनाने होते. त्यानंतर रविवारी मातेची विधीवत प्रतिष्ठापना करून रोट पूजन केले जाते व रात्रभर पारंपरिक गीते गाऊन जागरण केले जाते.विशेषतः नाशिक, जळगाव, धुळे आणि नंदुरबार या खान्देशातील जिल्ह्यांमध्ये कानबाई माता उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. नोकरी आणि व्यवसायानिमित्त परगावी गेलेले आप्तेष्ट, नातलग या उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येतात. शहादा शहरातील जुन्या वसाहतींसह विविध नवीन रहिवाशी भागांत नागरिकांनी मोठ्या श्रद्धेने कानबाई मातेची स्थापना केली होती.सोमवारी सकाळी शहरातील विविध भागांतून सवाद्य मिरवणुका काढण्यात आल्या. पारंपरिक वाद्यांसह डीजे व अन्य वाद्यांच्या गजरात, कानबाई मातेच्या गाण्यांवर महिला-पुरुष आणि बालकांनी ठेका धरत आनंद लुटला. मित्रपरिवार व आप्तेष्टांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात निघालेल्या या मिरवणुकांनंतर भाविकांनी गोमाई नदीपात्रात मातेच्या मूर्तीचे विसर्जन केले. या तीन दिवसीय उत्सवामुळे संपूर्ण शहादा शहरात भक्तिमय व मांगल्याचे वातावरण पसरले होते.

आपला महाराष्ट्र

दिमागी नक्षल : विनाशकाले विपरीत बुद्धी

अर्बन नक्षली म्हणून बुद्धिजीवी लोकांची ते राष्ट्रभक्त असूनही टर उडविण्यात आली होती.कित्येकांना दीर्घकाळ तुरूंगात डांबण्यात आले होते.त्या सर्वांना न्यायालयाने पुराव्या अभावी निर्दोष सोडून दिले.व्यवस्थेला प्रश्न विचारणे आणि अन्याया विरूध्द आवाज उठविणे हा त्यांचा गुन्हा.त्यांना अर्बन नक्षली सांगत देशद्रोही ठरविण्यात आले.आपल्या राज्याचे प्रमुख देखील तसे म्हणण्यात सर्वात पुढे होते.ते पार ठेवणीतले शब्द पोतडीतून बाहेर काढत असतात.परवा त्यांनी राहुल गांधी यांना छछोरगिरी शोभत नाही असे म्हटले.त्यावर पोस्ट लिहून शेकडोंनी सोशल मीडियावर त्यांची इज्जत घेतली.तसलीच इज्जत लोकांनी देशाच्या प्रमुखांची घेतली आहे.त्यांनी राष्ट्राला उद्देशून भाष्य करताना युवकांना दिमागी नक्षली असे संबोधले.या नव्या शब्द प्रयोगामुळे देशभर वाद उफाळून आला असून कोणीतरी दिमागी नक्षल जनता पार्टी स्थापन करण्याची घोषणा केली आहे. देशाच्या सर न्यायाधिशांनी तरूणांना काक्रोच म्हणजे झुरळ म्हटले आणि एकच गदारोळ उठला. बोस्टन हून काक्रोच जनता पार्टीची स्थापना झाली.त्यापुढचे सगळे महाभारत सर्वांना माहीत आहे.दिल्लीतल्या जंतरमंतरवर चमत्कार झाला आणि व्यवस्थेला झुकावे लागले.विरोधी पक्षांनी विद्यार्थ्यांवर पॅलेट गनने केलेल्या गोळीबाराच्या संदर्भात सभागृहात आवाज उठविला.कामकाज बंद पाडले.थेट गृहमंत्र्यांना जबाबदार धरले.त्यांचा राजिनामा मागितला.परिणाम असा झाला की,सर्वोच्च नेते सभागृहात आलेच नाहीत. सत्र संपवून टाकले.एवढे प्रमाद एकट्या झुरळामुळे घडले.तो सारा राग शासकांच्या मनात होता.तद्वतच त्यांना संधी मिळाली. ऐतिहासिक लाल किल्ल्यावर दरवर्षाप्रमाणे यंदाही ध्वजारोहण करण्यात आले.नंतर नेहमी प्रमाणे देशाला उद्देशून संबोधण्यात आले मनातला राग बाहेर आला आणि जाब विचारणारांना त्यांनी दिमागी नक्षली म्हटले

नक्षली, अर्बन नक्षली आणि आता दिमागी नक्षली असे नक्षलवादींसाठी नवनवे शब्द शोधून काढण्यात येत आहेत.पण त्याविषयीचे कौतुक न होता खिल्लीच अधिक होत असल्याचे निदर्शनास आले. जर्मनीचा अनभिषिक्त सम्राट म्हणवला जाणारा अडाल्फ हिटलर स्वत:ला अंतीम समजत असे.रशियात हिवाळ्यात सैन्य घालण्यास लष्कर प्रमुखांनी विरोध दर्शविला असतांना त्यांची सल्ला न ऐकता सैन्य पाठविले आणि शेवटी नुकसान करून घेतले.पराभव दिसू लागताच जर्मनीचे लोकच माझ्या राजवटीच्या लायकीचे नाहीत असे त्याने सांगून टाकले.यालाच विनाशकाले विपरीत बुद्धी असे म्हणतात.तीच तऱ्हा आपल्या देशातील व्यवस्थेची आहे.काहीच सूचत नसले की,पराभूत मानसिकतेतून अशा तऱ्हेचे प्रमाद उदयाला येतात. सध्याच्या घडामोडी पाहता हा प्रश्न केवळ एका पक्षाचा किंवा एका भाषणाचा राहत नाही; सत्तेच्या राजकीय भाषेचे सार्वजनिक जीवनावर काय परिणाम होत आहेत, असा प्रश्न सहज उपस्थित होतो.

१५ ऑगस्टच्या लाल किल्ल्यावरील भाषणात विकास, ऊर्जा, युवक, २०४७ चा विकसित भारत कसा असेल यांसारखे मुद्दे जरूर मांडण्यात आले. असे असले तरी त्याच भाषणात दिमागी नक्षल हा शब्दप्रयोग करून अशा कथित वैचारिक शक्तींना ओळखून अलग करण्याचे आवाहन करण्यात आले. त्यावर विरोधकांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. यातून युवक पुन्हा बिथरतील आणि रस्त्यावर येतील एवढे निश्चित समजावे. लाल किल्ला हा पक्षीय व्यासपीठापेक्षा राष्ट्राच्या सामूहिक आशेचे व्यासपीठ असावे, अशी लोकांची अपेक्षा असते. त्यामुळे विरोधकांवर टीका, नव्या–नव्या राजकीय लेबलांची निर्मिती आणि आरोप–प्रत्यारोप यापेक्षा बेरोजगारी, महागाई, शिक्षण, शेती, आरोग्य, तरुणांची चिंता आणि सामान्य माणसाच्या जगण्याचे प्रश्न केंद्रस्थानी असावेत.अशी अपेक्षा आहे.मात्र तसे घडत नाही.काक्रोचच्या पार्श्वभूमीवर तरुणांमध्ये व्यवस्थेबद्दल असंतोष व्यक्त होत असल्याचेही दिसले. अशा वेळी आणखी एक पक्ष निर्माण होणे हा काही मूळ प्रश्न नाही पण लोकांना राजकारणापेक्षा उत्तरदायी शासन हवे आहे, हा त्यातून घेतला जाणारा धडा असू शकतो. अर्बन नक्षलीपासून दिमागी नक्षली पर्यंत शब्द बदलत गेले, तर एक मूलभूत धोका संभवतो.मतभेद आणि देशविरोध यांच्यातील सीमारेषा पुसली जाणे घातक ठरू शकते.

हिंसक नक्षलवादाविरुद्ध कठोर भूमिका असणे वेगळे; पण सरकारवर टीका करणारा, प्रश्न विचारणारा, बुद्धिजीवी किंवा असहमत नागरिक देशद्रोही किंवा नक्षलवादी ठरू नये असे स्वाभाविक पणे वाटते.मात्र तसे घडत नाही.लोकशाहीत सत्तेचा खरा कस विरोधक किती कमकुवत झाले यावर अवलंबून नसतो तर सामान्य माणसाचे प्रश्न किती गांभीर्याने ऐकले जातात आणि त्यांना किती उत्तरे मिळतात यात सामावलेला असतो. १४ ऑगस्टच्या मध्यरात्री संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अजरामर भाषण केले होते. हे भाषण केवळ शब्दांचा खेळ नव्हते तर स्वप्न आणि संकल्पांचा नाद होता. त्यांनी भारताच्या उज्वल भवितव्यासाठी दिशा दाखवली.लाल किल्ल्यावरून नेहरूंच्या भाषणाने स्वातंत्र्याच्या लढ्याला सलाम केला, तर राधाकृष्णन यांनी एकतेचे महत्त्व अधोरेखित केले. नेहरू म्हणाले,कित्येक वर्षांपूर्वी आपण नियतीशी करार केला होता आणि आता वेळ आली आहे, तेव्हा आपली ही प्रतिज्ञा पूर्णपणे नसली, तरी काही अंशी साकारणार आहोत. मध्यरात्रीच्या या प्रशांत समयी सारे जग झोपलेले असताना, भारत स्वातंत्र्याच्या युगात नवा जन्म घेत आहे. इतिहासात असा क्षण क्वचितच येतो, की जेव्हा आपण जुन्यातून नव्यात प्रवेश करतो, एक मोठे युग संपते आणि दीर्घ काळ दबल्या गेलेल्या देशाच्या आत्म्याला वाचा फुटते. अशा या गंभीर क्षणी आपण भारताच्या, भारतवासीयांच्या आणि त्याहूनही मोठ्या अशा मानवतेच्या कार्याला वाहून घेण्याची प्रतिज्ञा करीत आहोत,

इतिहासाच्या प्रारंभापासूनच भारताने न संपणाऱ्या अशा शोधाला सुरवात केली आणि कोणताही ठसा न उमटविणारी नंतरची शतके प्रयत्नांच्या आणि यशापयशाच्या भव्यतेने भारली गेली. चांगल्या आणि वाईट काळात देखील भारताला आपल्या या शोधाचा; तसेच स्वत:ला शक्ती देणाऱ्या मूल्यांचा कधीच विसर पडला नाही. एका दुर्दैवी कालखंडातील आपला प्रवास आज संपत आहे आणि भारताला पुन्हा एकदा स्वत:चाच शोध लागला आहे. एक मोठे यश आज आपण साजरे करीत आहोत. हे यश म्हणजे एक संधी आहे, जी आपल्या प्रतीक्षेत असणाऱ्या अनेक मोठ्या विजयांची आणि यशाची पायरी आहे. ही संधी घेण्याइतपत आणि भविष्याची आव्हाने पेलण्याइतपत आपण धैर्यशील आणि विचारशील आहोत काय? स्वातंत्र्य आणि सत्ता यांच्या जोडीने जबाबदारी देखील येते. ती स्वायत्त अशा भारतीयांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या स्वायत्त सभागृहात, म्हणजेच घटना परिषदेत. स्वातंत्र्याचा जन्म होण्याआधी आम्ही प्रसूतीच्या सर्व वेदना सहन केल्या आहेत आणि त्याच्या दुःखद आठवणींनी आमची मने जड झाली आहेत. यातील काही वेदना आपण आजही सहन करीत आहोत. परंतु आता हा इतिहास झाला आहे आणि भविष्यकाळ आपल्याला खुणावतो आहे.

भावी काळ सोपा नाही किंवा आरामदायीही नाही. आतापर्यंत आपण घेतलेल्या अनेक प्रतिज्ञांची आणि आज घेत असणाऱ्या प्रतिज्ञेची पूर्तता करण्यासाठी अविरत झटण्याचा हा काळ आहे. भारताची सेवा म्हणजे भारतातील कोट्यवधी पीडितांची सेवा. म्हणजेच दारिद्र्य, अज्ञान, रोगराई, संधींची असमानता यांचे उच्चाटन. प्रत्येक नेत्रातील प्रत्येक अश्रू पुसला जावा, ही आपल्या पिढीतील सर्वांत थोर व्यक्तीची महत्त्वाकांक्षा आहे. हे काम कदाचित आपल्या क्षमतेच्या पलीकडील असेल; परंतु जोपर्यंत दुःख आणि अश्रू असतील, तोपर्यंत आपले काम संपणार नाही. आपली स्वप्ने प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आपल्याला भरपूर कष्ट करावे लागतील; कठोर परिश्रम घ्यावे लागतील.

नेहरूजी नंतर लालकिल्ल्यावरून लाल बहादूर शास्त्री, श्रीमती इंदिरा गांधी,मोरारजी देसाई,चौधरी चरणसिंग, पी.व्ही.नरसिंहराव, राजीव गांधी, व्ही.पी.सिंग, आय.के.गुजराल, देवेगौडा, चंद्रशेखर, अटल बिहारी बाजपेयी, डॉ.मनमोहनसिंग यांची भाषणे भारतीय जनतेने ऐकली.त्यापैकी कोणीही विरोधी पक्षांवर आणि सवाल करणारांवर प्रहार केले नाहीत. देशाच्या विकासावरच सगळे बोलले.पण अलीकडे सतत निवडणुकीच्या मानसिकतेत वावरत, विरोधकांना लक्ष करीतच बोलले जाते.विभाजनाची भाषा केली जाते.ही सगळी अराजकाची लक्षणे दिसतात.यालाच विनाश काले विपरीत बुद्धी असे म्हणतात.

सैनिकी विद्या.तील चार विद्यार्थिनींचा राज्यस्तरीय फुटबॉल संघात समावेश

धुळे, दि.१७ (प्रतिनिधी)- इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलित श्री.छत्रपती सैनिकी विद्यालय मोराणे प्र.नेर येथील तब्बल चार विद्यार्थिनींची नुकतीच राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धे साठी निवड झाली. लवकरच राज्यस्तरीत फुटबॉल स्पर्धा होणार असुन या चारही विद्यार्थिनी, राज्यस्तरीय संघात राज्याचे नेतृत्व करणार आहेत. या सर्व विद्यार्थिनींवर व संस्थेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

राज्यस्तरीय फुटबॉल संघ निवडीसाठी नुकतीच निवड चाचणी घेण्यात आली. शिरपुर येथे झालेल्या या मुलींच्या निवड चाचणीत अनेक विद्यार्थिनींची फुटबॉल चाचणी घेण्यात आली. यात इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलित मोराणे सैनिकी विद्यालयातील कल्याणी गवळी, आमिषा चौधरी, भाग्यश्री साबळे, सीमा कांबडे या विद्यार्थिनींची राज्यस्तरावरील वरिष्ट गटाच्या फुटबॉल संघात निवड करण्यात आली.

राज्यस्तरीय फुटबॉल संघात निवड झालेल्या या विद्यार्थिनींचे, मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले उत्कृष्ट खेळाडू व फिजिकल कोच जयवंत ठाकूर, दिपक पाटील तसेच संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब रावण भदाणे, सचिव तथा माजी जि.प.सदस्या शालिनी बाळासाहेब भदाणे, प्राचार्य एस.बी. गरुड, उपप्राचार्य एन. जे. देवरे, पर्यवेक्षक बी.एच.मगर, व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मुलींचे व क्रीडा प्रमुख एस.एस.देवरे, क्रीडा शिक्षक बी.एम.बविस्कर, फुटबॉल कोच रोहित अहिरे आदींचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विहिरीत पडल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

धुळे, दि.१७- होळ (ता. शिंदखेडा) येथील गणेश गुलाब पाटील (वय ४५) पाय घसरुन विहिरीत पडले. पाण्यात तरंगताना दिसत होते. रविवारी दुपारी घटना निदर्शनास आली. गणेश पाटील यांना ग्रामस्थांच्या मदतीने बाहेर काढुन प्राथमिक आरोग्य केंद्र नरडाणा येथे दाखल केले. डॉ. मनोज राजपुत यांनी मृत घोषित केले. नरडाणा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. सहाय्यक उपनिरीक्षक हेमंत पाटील तपास करीत आहेत.

वीजपंपाची चोरी दोघांविरुद्ध गुन्हा

धुळे, दि.१७- चिमठावळ (ता. शिंदखेडा) शिवारातील शेतातून चोरट्यांनी विहिरीतील वीजपंप (जलपरी) चोरून नेला.

चिमठावळ शिवारात जिभाऊ बाबुराव पाटील यांचे गाव शिवारात शेत आहे. रोहित संजय तडवी (वय २१), जयपालसिंग नानाभाऊ गिरासे (वय २५, दोघे रा. चिमटावळ) यांनी वीजपंप चोरून नेल्याचे चौकशीत आढळले. याप्रकरणी दोन संशयितांविरुद्ध शिंदखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

प्रकाश में आज के.डी.दडेविल

संजय दत्त शिल्पा शेट्टी ध्रुवसरजा रिश्मा नानाइया वी रवि चंद्रन नोरा तेही किच्चा सुदीप रवि चूंदन

शिंदखेड्यात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

शिंदखेडा, दि.१७- स्वातंत्र्य दिवस व भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतीलाल मुथा यांचा जन्मदिवसानिमित्त शिंदखेडा शाखेच्या वतीने एमएचएसएस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तसेच अँग्लो उर्दू हायस्कूलच्या ई.५वी च्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी जैन संघटनेचे खानदेश विभाग अध्यक्ष प्रा.चंद्रकांत डागा, विभाग महासचिव अशोक राखेचा,शहराध्यक्ष मयुर ओस्तवाल, उपाध्यक्ष महेंद्र साबद्रा, कोषाध्यक्ष सुरेश गिडिया, संस्थेचे चेअरमन स्वप्नील देसले, संचालक डॉ.एन.पी.पाटील ,प्रदीप दीक्षित,भैय्या चौधरी, लक्ष्मण पाटील,मुख्याध्यापक टी. एन. पाटील, के.बी अहिरराव,अजीज शेख, परेश देसले वआदी उपस्थित होते.नृत्यात सहभागी विद्यार्थिनींना जैन संघटनेकडून रोख पारितोषिक देण्यात आले.सूत्रसंचालन प्रा.भैय्या मंगळे तर आभार प्रा. संदीप गिरासे यांनी मानले.

साम्य योग साधना कार्यालयात ध्वजारोहण उत्साहात साजरा

धुळे, दि.१७- भारतीय स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त साम्यक साधनाच्या कार्यालयात उत्साहाने ध्वजारोहण करण्यात आले. विजयाताई आणि चंद्रशेखर पाटील (दिल्ली नौएडा) सरोज ताई आणि अशोक पाटील नागपूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करून मानवंदना देण्यात आले.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून राष्ट्रगीता नंतर नाजनीन शेख यांनी वंदे मातरम गायले. तसेच हीच आमची प्रार्थना अन हेच आमचे मागणे हे प्रार्थना गीत सादर केले. याप्रसंगी पत्रकार संघाचे सरचिटणीस डी.बी.पाटील, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष संदीप पाटील, प्रकाश चव्हाण, अर्जुन वीरकर, प्रतिभा वीरकर, सपना पाटील, वैशाली पिंगळे, वैशाली सोनवणे, किरण येवले, रत्ना गवळी, मुकेश पाटील, धीरज देवरे, आदी मान्यवरांसहित प्रमोद नगर मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. साम्ययोग साधनाचे संपादक रमेश दाणे यांनी सर्वांचे स्वागत केले.

वडणे निसर्ग खान्देश मंचच्या वतीने वृक्ष लागवड; संवर्धनाचाही संकल्प

वडणे,दि.१७(प्रतिनिधी)- गावच्या काळ्या मातीशी असलेले नाते जपत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या भूमिपुत्रांचा गौरव आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा अनोखा उपक्रम धुळे तालुक्यातील वडणे येथे रविवारी, दि.१६ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडला. वडणे निसर्ग खान्देश मंचच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आदर्श सत्कार समारंभासोबतच लोकसहभागातून तब्बल २७० विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. त्यामुळे कर्तृत्ववाचा सन्मान आणि निसर्ग संवर्धनाचा संकल्प यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून घडून आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थ पुंडलिक जयराम पाटील यांनी भुषविले.

हरित वडणेसुंदर वडणे, स्वच्छ वडणे, आदर्श वडणे या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत मंचाच्या माध्यमातून यापूर्वी दोन टप्प्यांत सुमारे २६० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. त्यानंतर तिसऱ्या टप्प्यात बेलपत्र, जांभूळ, पेरू, सीताफळ, आवळा, खैर, महू, हिरडा, पिंपळ, वड, अशोक आदी स्थानिक वातावरणाला अनुरूप विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. ग्रामस्थांच्या अंगणात तसेच शेतांच्या बांधावर लागवडीसाठी वृक्ष उपलब्ध करून देण्यात आले. रोपांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे यासाठी लोखंडी जाळ्यांचीही व्यवस्था करण्यात आली.

कर्तृत्ववान भूमिपुत्रांचा गौरव

वडणे गावाचे नाव विविध क्षेत्रांत उज्वल करणाऱ्या भूमिपुत्रांचा शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ. निखिल नवटे, शांताराम शिंदे, मनोहर पाटील, श्रीराम पाटील, पंकज पाटील, अविनाश शिंदे, शरद जगताप, ज्ञानेश्वर पाटील, शिक्षक संदीप ठाकरे, उज्वला ठाकरे, विजय पाटील, ग्रामविकास अधिकारी प्रविण बोरसे, पोलीस राकेश पाटील, व्याख्यान प्रवक्ता घनश्याम ठाकरे, आरती गिरासे, साई गिरासे, शुभम पाटील, उत्तम माळचे, तुषार ठाकरे, प्रियंका ठाकरे तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे चालक प्रदीप गिरासे यांचा गौरव करण्यात आला.

पर्यावरण संवर्धनासाठी भूमिपुत्रांचा पुढाकार

गुजरात राज्यात स्थायिक असलेले वडणेचे सुपुत्र उद्योजक प्रविण पाटील व सुनील पाटील यांनीही या पर्यावरणपूरक चळवळीला सहकार्य केले. गावच्या मातीत वाढलेल्या भूमिपुत्रांनी गावाशी असलेले ऋणानुबंध जपत पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेतल्याबद्दल वडणे निसर्ग खान्देश मंचच्या वतीने त्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

वृक्ष लावापेक्षा वृक्ष जगवाचा संदेश

कार्यक्रमात वडणे निसर्ग खान्देश मंचचे अध्यक्ष डॉ. रविंद्र पाटील, उपाध्यक्ष प्रा. विजय पाटील, ग्रामसेवक वडणे सुपुत्र विजय पाटील, आदर्श शेतकरी श्रीराम ठाकरे, आदर्श शिक्षक सुनील ठाकरे, व्याख्यान प्रवक्ता घनश्याम ठाकरे, शिक्षण क्षेत्रातील हिरालाल ठाकरे, कृषिभूषण व सेंद्रिय शेती प्रवक्ता श्री. दिलीप पाटील ठाकरे, ग्रामविकास अधिकारी प्रविण बोरसे, ओंकार पाटील तसेच या निसर्ग चळवळीचे जनक पत्रकार श्रीकृष्ण पाटील यांनी निसर्ग संवर्धन, वृक्षलागवड, पर्यावरणाचे महत्त्व आणि हरित वडणेच्या संकल्पनेवर मार्गदर्शन केले.

पर्यावरण चळवळीला बळ

वडणे निसर्ग खान्देश मंचच्या माध्यमातून सुरू झालेल्या पर्यावरण चळवळीला ग्रामस्थांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. घराच्या अंगणापासून शेताच्या बांधापर्यंत वृक्षलागवडीचा विस्तार होत असल्याने गावाच्या हरित पट्ट्याला बळ मिळण्याची अपेक्षा आहे. विशेष म्हणजे, स्थानिक पातळीवर उपलब्ध आणि पर्यावरणीयदृष्ट्या उपयुक्त विविध वृक्षप्रजातींची निवड करून त्यांची लागवड करण्यात आल्याने या उपक्रमाला अधिक व्यापक पर्यावरणीय महत्त्व प्राप्त झाले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय पाटील यांनी केले, तर आभार वडणे निसर्ग खान्देश मंचचे अध्यक्ष डॉ. रविंद्र पाटील यांनी मानले.

पेठ, सुरगाणा, दिंडोरीत सोमवारी भुकंप जाणवला

नाशिक, दि.१७- नाशिक जिल्हा पुन्हा एकदा भूकंपाच्या धक्क्यांनी हादरला आहे. जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा आणि दिंडोरी या तीन प्रमुख तालुक्यांमध्ये आज दुपारी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरगाणा तालुक्यातील बोरगाव परिसर तसेच पेठ तालुक्यातील गोंदे, भायगाव, जांभूळमाळ आणि हरणगाव भागामध्ये दुपारी बारा वाजून चाळीस मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले. यानंतर लगेचच, अवघ्या पाच मिनिटांनी म्हणजेच दुपारी बारा वाजून पंचेचाळीस मिनिटांनी दिंडोरी तालुक्यातील ननाशी आणि बागडीचा पाडा परिसरात जमिनीला हादरे बसले. अचानक बसलेल्या या धक्क्यांमुळे नागरिक घराबाहेर पडले. नाशिकच्या ग्रामीण आणि आदिवासी भागात सातत्याने भूकंपाचे हादरे बसत असल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र घबराट पसरली आहे. वारंवार होणाऱ्या या भूकंपांमुळे प्रशासनाने तत्काळ याची दखल घेऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

मागील काही दिवसांत नाशिकमध्ये सातत्याने भूकंपाचे सौम्य धक्के जाणवत आहे. मागील महिनाभरात नाशिकमध्ये चार ते पाच वेळा भूकंपाचे धक्के बसले आहेत. वारंवार बसणाऱ्या भूकंपाच्या धक्क्यामुळे नाशिककरांमध्ये भितीचे वातावरण आहे. नाशिक जिल्हा प्रशासनाकडून सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे.

शब्दकोडे क्रमांक : २४३४



आडवे शब्द : १.कामगार ३.देशाची किंवा क्षेत्राची होणारी प्रगती किंवा सुधारणा ५.दोन व्यक्तींची होणारी भेट किंवा एकत्र येणे ७.आमटी किंवा रश्यावर तरंगणारा तेलाचा थर ८.गळ्यात घालण्याचा फुलांचा हार किंवा सुवर्णाची माळ ९.डोंगराचा तीव्र उतार ११.तो-विरुद्ध १२.देशाचे अधिकृत नाणे किंवा पैसा १४. पारंब्या असणारा एक मोठा आणि पवित्र वृक्ष १५.वडिलांचे भाऊ १७.राघूची जोडीदारीण १८.संकटातही टिकून राहणारा, चिकाटी असलेला २२.कागद किंवा माती पाण्यात भिजवून केलेला मऊ गोळा २३.एक पाश्चिमात्य देश २४.युरोपियन देशांचे सामायिक चलन २५.डोंगरावरून वेगाने वाहणारा पाण्याचा प्रवाह २७.नवीन किंवा नुकताच तयार केलेला २९.मुलगा ३०.जंगलात लागलेली आग ३२.नंतर ३४.एखादे काम करण्याची मिळालेली सुवर्णसंधी ३५.स्वयंपाकात वापरली जाणारी तरकारी ३६.समुद्र किंवा नदीची वाळू ३७.लहान मुलांचे रडणे किंवा गोंगाट ४०.काळजी४१.राजासारखा रुबाबदा ४२.गोमाता ४४.औषधी वनस्पतींचा उकळलेला रस ४५.पाय ४७.अगर सिद्धी उंगलीसे नहीं निकाल तो * निकालाने के लिये उंगली तेडी करनी पडती हैं 'एक प्रचलित वाक्यप्रचार ४८.नेहमी किंवा कायम ५१.मनाची दोलायमान अवस्था ५५.ज्येष्ठ अभिनेते शत्रुघ्न सिंह यांचा एक सिनेमा ५६.दिखाऊपणा

उभे शब्द : १.अत्यंत कठीण, कडक किंवा घट्ट २.बुद्धिबळातील डाव ३.मनाला लागलेली अतीकाळजी किंवा घोर चिंता ४.५.मूळ वस्तूत केलेली भेसळ ६.चित्रपट किंवा नाटकात काम करणारी अभिनेत्री १०.जबरी चोरी १३.एक मुलाचे नाव १६.रस्सा १७.पटांगण १९.वतन राखणारा २०.निःस्वार्थपणे सेवा करणारा २१.आकाश २६.एक प्रसिद्ध बैठी लावणी 'या * बसा भावजी'२८.चुकीचा मार्ग ३१.पुष्कळ ३३.गरज असलेला ३५.भाग देण्याची क्रिया ३८.चिलट ३९.तबल्याचा साथीदार ४३.इंग्रजीत-हो ४६.घड्याळाचा ठोका ४९.सेवक ५०.टाळी-हिंदीत ५२.लढाई ५३.स्वर ५४.दर

शब्दकोडे क्रमांक : २४३३ चे उत्तर

ग	ट	■	सं	घ	र्ष	■	नि	व	ड	■	को
ज	■	क	पा	ट	■	ता	रा	■	क	ल	म
■	सं	वा	द	■	उ	प	का	र	■	हा	ल
आ	ग	■	क	र	डी	■	र	■	घ	न	■
प	त	न	■	शी	■	पा	■	चो	र	■	वि
ण	■	वा	स्तु	■	अ	च	र	च	■	र	ज
■	बा	ब	■	म	■	क	म	■	सं	ज	य
थो	र	■	म	हा	ग	■	मा	ळी	■	त	प
■	दा	द	ला	■	म	र	ण	■	र	■	थ
स	न	म	■	गा	भ	ण	■	प	वि	त्र	■
द	■	दा	सी	■	न	■	क	ळ	वा	■	मा
रा	हू	टी	■	घी	■	न	ष्ट	■	र	ई	त

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI DOLBY DIGITAL PLUS

ता. १८ से रोज १ खेल टा. १२ बजे
बटवारा-1947 (हिंदी)
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.
bookmyshow

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI DOLBY DIGITAL PLUS



ता. १८ से रोज ३ खेल टा. ३,६,९ बजे
आवारापन-2 (हिंदी)
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.
bookmyshow

परिवर्धाच्या माध्य.विद्या.त मोफत गणवेश वाटप

शहादा,दि.१७ (प्रतिनिधी)- तालुक्यातील परिवर्धा येथील गुरुवर्य गोविंद श्रीपत पाटील माध्यमिक विद्यालयात परिवर्धा येथील दानशूर व्यक्तिमत्व व हल्ली हैदराबाद येथे वास्तव्यास असलेले मनीषाबेन व कल्पेशभाई राजाराम पटेल यांची सुकन्या निलेश्वरी हिच्या वाढदिवसा निमित्त इ.५ वीतील ७० विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक जगदीशभाई पाटील हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून भरतभाई लक्ष्मण पाटील, हरिकृष्ण गोपाळ पाटील, शाळेचे ज्येष्ठ शिक्षक के.एन.पाटील हे उपस्थित होते. या प्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणातून शाळेचे मुख्याध्यापक जगदीशभाई पाटील यांनी सौ.मनीषाबेन व कल्पेशभाई राजाराम पटेल यांनी यावर्षी प्रवेशित इयत्ता पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार व्यक्त करून शाळेतर्फे निलेश्ववरी हिला वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी गणवेशाची स्वच्छता राखून, गणवेशाला साजेसे वर्तन शिस्तपालन व शिक्षणात उत्तम प्रगती हीच या दात्यांप्रती कृतज्ञता असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीमती आर.ए.पाटील यांनी मानले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक बंधू-भगिनी, शिक्षकेतर व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

बालरंगभूमी परिषदेच्या इतिहास महाराष्ट्राचा महोत्सवात लोकमान्य टिळक विद्या.चे यश

नंदुरबार,दि.१७(प्रतिनिधी)- बालरंगभूमी परिषद, मुंबई आयोजित इतिहास महाराष्ट्राचा या महोत्सवाच्या राज्यस्तरीय महाअंतिम फेरीत नंदुरबार येथील लोकमान्य टिळक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी समूह गटात, तर हस्ती वर्ल्ड स्कूल, दोंडाईचा येथील विनिशा विकास बाटुंगे हिने एकल लहान गटात प्रशंसनीय पारितोषिक मिळविले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या चरित्रावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन या महोत्सवात करण्यात आले होते. बालरंगभूमी परिषद नंदुरबार जिल्हा शाखेच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय प्राथमिक फेरीत लोकमान्य टिळक विद्यालयाने समूह गटात, तर विनिशा विकास बाटुंगे हिने एकल लहान गटात प्रथम क्रमांक पटकाविला होता.

जिल्हास्तरावर प्रथम पारितोषिक मिळविलेल्या विजेत्यांची राज्यस्तरीय महाअंतिम फेरी दि. ०९ ऑगस्ट २०२६ रोजी माऊली सभागृह, अहिल्यानगर येथे पार पडली. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे ४५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

महाअंतिम फेरीत लोकमान्य टिळक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या चरित्रावर आधारित समूह नृत्य सादर केले. तर हस्ती वर्ल्ड स्कूल, दोंडाईचा येथील विनिशा विकास बाटुंगे हिने नाट्यछटा सादर केली. या दोन्ही स्पर्धकांना राज्यस्तरीय महाअंतिम फेरीत प्रशंसनीय पारितोषिक मिळाले.

बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा डॉ. नीलम शिर्के-सामंत यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी लोककलावंत डॉ. गणेश चंदनशिवे, अभिनेते दिगंबर नाईक, ज्येष्ठ रंगकर्मी संजय हळदीकर तसेच बालरंगभूमी परिषदेचे राज्य कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

लोकमान्य टिळक विद्यालयातील विद्यार्थिनी व विनिशा विकास बाटुंगे हिला मिळालेल्या या यशाबद्दल आमदार चंद्रकांत रघुवंशी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल वाघ, शिक्षणाधिकारी भानुदास रोकडे, उपशिक्षणाधिकारी भावेश सोनवणे, हस्ती वर्ल्ड स्कूलचे चेअरमन कैलास जैन, लोकमान्य टिळक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रीतम परदेशी, हस्ती वर्ल्ड स्कूलचे प्राचार्य जीवन सपकाळे, बालरंगभूमी परिषदेचे राज्य कार्यकारिणी सदस्य रंगकर्मी नागसेन पेंढारकर, अध्यक्ष राजेश जाधव यांच्यासह नंदुरनगरीतील मान्यवरांनी शुभेच्छा देत कौतुक केले.

या स्पर्धेत लोकमान्य टिळक विद्यालयातर्फे भाग्यश्री नाईक, आराध्या ठाकरे, दिव्या भील, प्रिया भील, ममता वसावे, भारती ठाकरे, खुशी भील, पुनम भील, पूनम भील आणि जानवी भील या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या यशासाठी कलाशिक्षक रविशंकर सामुद्रे व विकास बाटुंगे यांनी मार्गदर्शन केले. तसेच कलावंती महाले, रवि गावित, मोहिनी सोनवणे आणि शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

छ.शिवाजी इंग्लिश मेडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर चर्चा

साक्री,दि.१७(प्रतिनिधी)- येथील श्री छत्रपती शिवाजी इंग्लीश मेडियम स्कुल मधे पार पडलेल्या पालक-शिक्षक व संस्थाचालकांच्या मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर चर्चा व शालेय समित्यांची निवड करण्यात आली.

शै.वर्ष २०२६-२७ चा छ.शिवाजी इंग्लीश मेडियम स्कुलचा हा पहिला सर्व समावेशक पालक-शिक्षक मेळावा बुधवारी घेण्यात आला. ज्याच्या अध्यक्षस्थानी सदाचार ज्ञान प्रबोधिनीचे चेअरमन प्रभाकरदादा चौधरी हे होते तर प्रमुख पाहुण्यात सेक्रेटरी प्रा.एस. एन.खैरणार, संचालकांत प्रा.एल. जी.सोनवणे, ए.पी.दशपुते, बी.एम.भामरे, शाळा व्यवस्थापन समितीचे मिलिंद वाघ,श्रीमती कल्पना पाटील ,अंकुश परदेशी आदि मान्यवर उपस्थीत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभाकर चौधरी व मान्यवरांच्या हस्ते प्रारंभीच राजमाता जीजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पुजन व दिप प्रज्वलन करुन सुरुवात झालेल्या या मेळाव्याच्या प्रस्ताविकेत प्राचार्य बी.एम.भामरे यांनी मेळाव्याचे हेतुकथन केले.

या प्रसंगी पालक- शिक्षक संघाच्या सचिव जयश्री झगडे यांनी मागिल सभेचे प्रोसिडींग वाचुन त्यास संमती घेत ते कायम करण्यात आले व गेल्या वर्षीचा अहवाल सादर केला,त्या नंतर चालु शै.वर्ष २०२६-२७ साठी शाळा व्यवस्थापन समिती,पालक-शिक्षक संघ ,माता -पालक संघ व परिवहन समित्यांचे पुनर्गठण करण्यात येवुन नुतन कार्यकारीणींचा सत्कार करण्यात आला.पालकांत श्रीम. कल्पना पाटील यांनी शाळेचे नांव छ.शिवाजी इंग्लिश मेडियम स्कुल असुन नावाला साजेसे शालेचे कामकाज चालत असल्याबद्दल समाधान व्यक्त करत, शाळेने लहान वयापासुनच विद्यार्थ्यांच्या क्रीडागुण विकासावरही भर देण्याचे आवाहन केले. मिलिंद वाघ व अंकुश परदेशी यांनीही शाळेचे प्रशासन व शिक्षकवृंद चांगले काम करत असल्याचे सांगुन समाधान व्यक्त केले.

आपल्या मार्गदर्शनात सेक्रेटरी एस.एन.खैरणार,संचालक ए.पी. दशपुते व एल.जी सोनवणे यांनी पालकांनी घ्यावयाच्या विद्यार्थ्यांच्या काळजी व जबाबदा-यांविषयी पालकांची सप्तपदी आदि सोदाहरणे देत मार्गदर्शन केले व शालेय कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले.या प्रसंगी गेल्यावर्षी इंडियन टॅलेंट स्पर्धा परिक्षेत सहभागी व मेडल प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाण पत्रांचे वितरण करत कौतुक करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्रभाकर चौधरींनी शालेय भौतिक सुविधा,क्रीडागुण आदी विकासासाठीच्या सुविधेत वृद्धी करण्याची ग्वाही देत चालु शै.वर्षासाठी शुभेच्छा प्रदान केल्या.

शालेय गीत मंचच्या चमुने प्रारंभिच स्वागत गीत गावुन उपस्थीतांचे स्वागत करण्यात आलेल्या या मेळाव्याचे सुत्र संचालन रोहीणी नेरे यांनी तर आभार प्रदर्शन विद्या बाविस्कर यांनी केले व यशस्वीतेसाठी राजश्री देवरे,स्वाती गांगुर्डे,भाग्यश्री नेरकर,हर्षदा निकम , ज्योती परदेशी, कल्पना सोनवणे व वैशाली बहिरम यांनी परिश्रम घेतले.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे महिंदळे येथील शांतुषा नगर (गंगा पार्क) नावाने ओळखल्या जाणारे स. नं. ९३/१-९३/२-९३/३-९३/४-९३/५-९३-६ या पैकी खालील प्लॉटस्

१. प्लॉट क्र. ९२ चे क्षेत्र १२० मीटर, २. प्लॉट क्र. ९८ चे क्षेत्र १३५ चौरस मिटर
३. प्लॉट क्र. २०६ चे क्षेत्र १२० चौरस मिटर ४. प्लॉट क्र. २०७ चे क्षेत्र १२० चौरस मिटर
५. प्लॉट क्र. २३९ चे क्षेत्र १२० चौरस मिटर ६. प्लॉट क्र. २४० चे क्षेत्र १२० चौरस मिटर
७. प्लॉट क्र. २४१ चे क्षेत्र १२० चौरस मिटर ८. प्लॉट क्र. २४२ चे क्षेत्र १२० चौरस मिटर
९. प्लॉट क्र. २४३ चे क्षेत्र १२० चौरस मिटर १०. प्लॉट क्र. २४४ चे क्षेत्र १२० चौरस मिटर
११. प्लॉट क्र.२४५ चे क्षेत्र १२० चौरस मिटर १२. प्लॉट क्र.२४६ चे क्षेत्र १९२.००चौरस मिटर
१३. प्लॉट क्र.२७१ चे क्षेत्र११६.००चौरस मिटर १४. प्लॉट क्र.२७२ चे क्षेत्र ११६.०० चौरस मिटर
१५. प्लॉट क्र. २७३ चे क्षेत्र ११६.०० चौरस मिटर१६. प्लॉट क्र. २८२ चे क्षेत्र ११६.०० चौरस मिटर
१७. प्लॉट क्र. २८३ चे क्षेत्र ११६.०० चौरस मिटर

असे एकूण १७ प्लॉटस् चे एकूण क्षेत्र २१०७ चौ. मी. बखळ प्लॉटस्

यासी लागू मापे व चतु:सिमा मंजूर ले-आउट प्रमाणे व आहे. त्या वस्तु स्थिती प्रमाणे

सदर बखळ प्लॉटस् शांतुषा एव्हरशाईन भागीदारी फर्म यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील असून त्यांनी उपरोक्त बखळ प्लॉटस् कायमस्वरूपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकत लवकरच खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर प्लॉटस्च्या बाबतीत इतर सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी, हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा. करार, मुखत्यार, मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर बखळ प्लॉटस्वर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार, असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर बखळ प्लॉटस् संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा पपस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणचीही हरकत असल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. ठिकाण : धुळे दि. १७/०८/२०२६

ॲड.चेतन महादु यादव मो. ९६८९१२४६९२
ऑफिस : सि. स. नं. २५९७/अ श्रीसदगुरु सदन, गल्ली नं. ५, मिरच्या मारुती चौक, धुळे ४२४००१

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे महिंदळे येथील शांतुषा नगर (गंगा पार्क) नावाने ओळखल्या जाणारे स. नं. ९३/१-९३/२-९३/३-९३/४-९३/५-९३-६ या पैकी खालील प्लॉटस्

१. प्लॉट नं. ९३ चे क्षेत्र १९२ मीटर, २. प्लॉट क्र. २३१ चे क्षेत्र १२० चौरस मिटर
३. प्लॉट क्र. २३२ चे क्षेत्र १२० चौरस मिटर ४. प्लॉट क्र. २३३ चे क्षेत्र १२० चौरस मिटर
५. प्लॉट क्र. २३४ चे क्षेत्र १२० चौरस मिटर ६. प्लॉट क्र. २३५ चे क्षेत्र १२० चौरस मिटर
७. प्लॉट क्र. २३६ चे क्षेत्र १२० चौरस मिटर ८. प्लॉट क्र. २३७ चे क्षेत्र १२० चौरस मिटर
९. प्लॉट क्र. २३८ चे क्षेत्र १२० चौरस मिटर १०. प्लॉट क्र. २९१ चे क्षेत्र १२० चौरस मिटर
११. प्लॉट क्र. २९३ चे क्षेत्र १२० चौरस मिटर१२. प्लॉट क्र. २९९ चे क्षेत्र १२० चौरस मिटर
१३. प्लॉट क्र. ३०० चे क्षेत्र १२० चौरस मिटर१४. प्लॉट क्र. ३०१ चे क्षेत्र १२० चौरस मिटर
१५. प्लॉट क्र. ३०२ चे क्षेत्र १२० चौरस मिटर१६. प्लॉट क्र. ३०३ चे क्षेत्र १२० चौरस मिटर

असे एकूण १६ प्लॉटस् चे एकूण क्षेत्र १९९२.० चौ. मी. बखळ प्लॉटस्

यासी लागू मापे व चतु:सिमा मंजूर लेआउट प्रमाणे व आहे. त्या वस्तु स्थिती प्रमाणे

सदर बखळ प्लॉटस् शांतुषा एव्हर शाईन भागीदारी फर्म यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील असून त्यांनी उपरोक्त बखळ प्लॉटस् कायमस्वरूपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकत लवकरच खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर प्लॉटस्च्या बाबतीत इतर सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी, हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा. करार, मुखत्यार, मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर बखळ प्लॉटस्वर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार, असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर बखळ प्लॉटस् संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा पपस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणचीही हरकत असल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. ठिकाण : धुळे दि. १७/०८/२०२६

ॲड.चेतन महादु यादव मो. ९६८९१२४६९२
ऑफिस : सि. स. नं. २५९७/अ श्रीसदगुरु सदन, गल्ली नं. ५, मिरच्या मारुती चौक, धुळे ४२४००१

जाहीर प्रगटन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. यूटीए २०२१/प्र.क्र.२१४/सामासू दि.२० नोव्हेंबर २०२५ अन्वये अत्याचारास बळी पडलेल्या खुन/मृत्यु प्रकरणातील मृत व्यक्तींच्या वारसास (एका व्यक्तीस) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ या कायदयांतर्गत शासकीय/निमशासकीय नोकरी देण्यासंदर्भात धोरण ठरविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने गुन्हा रजिस्टर नंबर २५/२०/२/२०१६ शिंदखेडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे. सदर प्रकरणातील दिवंगत व्यक्ती कै. पन्नेलाल बलभदर सोनकर (मयत) रा.सिटकहना जोत केशव पोस्ट धरसवा ता.जि.बहराईच (उत्तरप्रदेश) यांच्या वारसांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी या संदर्भात सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धुळे सामाजिक न्याय भवन, सिंचनभवनच्या पाठीमागे अ वींग, धुळे ता.जि.धुळे येथुन अर्ज नमुना प्राप्त करुन व इतर माहितीसाठी तात्काळ सदरच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. जर दिवंगत व्यक्ती कै.पन्नेलाल बलभदर सोनकर (मयत) यांच्या वारसांनी विहीत मुदतीत संपर्क न केल्यास सदर निर्णयानुसार त्यांचा नोकरी व इतर सहाय्याबाबत हक्क राहणार नाही व त्याबाबत हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

जाहिरात क्र जिमाका/धुळे/जाहि/८६/२०२६-२७

(देविदास नांदगावकर)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, धुळे

श्री जोगेश्वरी माता विश्वस्त मंडळ, धुळे
सेंट्रींग काम व बांधकामसाठी निविदा

मौजे मेथी ता. शिंदखेडा जि. धुळे येथील कुलस्वामिनी जोगनीया जोगेश्वरी मातेच्या मंदिर परिसरात भक्त निवास इमारतीचे बांधकाम सुरु असून त्या इमारतीच्या पुढील उर्वरीत टप्प्याचे सेंट्रींग काम व वीट काम, प्लास्टरसह करण्यासाठी मजूरी तत्वानुसार काम करु इच्छित ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. कामाचे स्वरुप अंदाजित खालील प्रमाणे आहे.

अ.नं.	कामाचे स्वरुप	अंदाजित क्षेत्रफळ
१)	भक्तनिवास इमारतीच्या तयार असलेल्या प्लॅननुसार दुसरा, तिसरा व चौथा मजल्याचा बीम,कॉलम, पडदी व त्यावरील स्लॅब टाकणे.	२५०००-३०००० स्क्वे.फूट अंतिम मोजमाप करुन हिशोब होईल.
२)	भक्तनिवास इमारतीच्या तयार असलेल्या प्लॅन नुसार खोल्या बांधकाम, प्लास्टर त्यासंबंधीत फिनिर्शींगची कामे.	स्क्वे.फूट नुसार जागेवर मोजमाप करुन क्षेत्रफळा प्रमाणे हिशोब होईल.

वरील कामासाठी लागणारे रेती, खडी, सिमेंट, स्टील, वीट, पाणी व अन्य किरकोळ बाबी संस्थेमार्फत पुरविण्यात येतील. इच्छुक ठेकेदार/कॉन्ट्रॅक्टर यांनी आपली निविदा मंगळवार दि. २५/८/२६ पर्यंत खालील पत्त्यावर बंद लिफाफ्यात पाठवावी.

-: निविदा पाठविण्याचा पत्ता :-

कपूरचंद लक्ष्मण बाविस्कर (मो. ९४२२७ ८७०९८)
सेक्रेटरी
जोगेश्वरी माता विश्वस्त मंडळ, धुळे
प्लॉ. नं. २४, गोवर्धन नगर, चावरा शाळेजवळ, वलवाडी देवपूर धुळे

अध्यक्ष
श्री.महादु पुंजू वाणी
मो. ९३२२२८११५६

सचिव
श्री.कपुरचंद लक्ष्मण बाविस्कर
मो. ९४२०८६७०३६

खजिनदार
श्री.निंबा मुरलीधर अमृतकर
मो. ८३०८८२२६८५

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. १४/१/१ मधील प्लॉट नं. ६ चे क्षेत्र २३० चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : स. नं. ७, दक्षिणेस : प्लॉट नं. ७ व ९, उत्तरेस : प्लॉट नं. ५, येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत १) श्री. अशोक फुलचंद बाफना, रा. ११ ब, मुंदांकरवाडी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे २) जडाबाई फुलचंद जैन रा. गांधी चौक, शिंदखेडा जि. धुळे यांच्या मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लिज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण, हितसंबंध, देणे घेणे वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानिशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे. असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

धुळे दि. १७/०८/२०२६

ॲड.विजय म. मोरे
नोटरी भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे **मो.** ९८२२८५२६५०

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी जि. प. धुळे व ता. पं. स. धुळे पैकी धुळे मनपा बाहेरील मौजे खेडे शिवार येथील गट क्र. १९५/१/१ क्षेत्र १ हे. ०७ आर पैकी पश्चिमेकडील क्षेत्र ० हे. ४० आर. जिरायत शेतजमीन या वर्णनाची मिळकत त्यासी चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : गट क्र. १९५/१/१ चा उर्वरित भाग, पश्चिमेस : गट नं. १९४/२, दक्षिणेस : धुळे -साक्री रस्ता, उत्तरेस गट नं. १९६.

ही मिळकत श्री. प्रकाश महादू पवार रा. साक्री रोड, धुळे ता. जि. धुळे यांच्या मालकीची असून कब्जे उपभोगातील आहे. सदर वर वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक यांचेशी कायम खरेदीने घेण्याचे ठरले असून तसा सौदापावतीचा व्यवहार केलेला असून बयाणा रक्कम देखील मालकांना अदा केलेली आहे. आमचे अशिल लवकरच वरील मिळकतीचा कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी वर नमूद वर्णनाची मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारची मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण,बोजा,टांच,जप्ती, भाडेपट्टा हक्क अथवा वित्त संस्था, बँका, पतसंस्था यांचा सदर मिळकतीवर बोजा असल्यास मुळ कागदपत्रासह खालील पत्त्यावर ८ दिवसांच्या आत संपर्क साधावा. व आपली लेखी हरकत नोंदवावी. परस्पर जाहीर हरकत घेवू नये अन्यथा आमचे अशिलावर नमूद मिळकत ही निर्बोज, निर्वेज आहे असे समजून येत्या ८ दिवसात व्यवहार पूर्ण करतील, सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. त्यामुळे होणाऱ्या खर्चास व परिणामास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

सदर जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या कागदपत्रे व माहितीच्या आधारे आमचे मार्फत दिली असे.

धुळे दि. १७/०८/२०२६

ॲड.महेश अरुण चव्हाण
जिल्हा न्यायालय, स्टेशनरोड, धुळे
मो. ८२७५००७२१८
९३७०३२५१०५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन- तु.जि.धुळे पो.तु.ता. धुळे पैकी मौजे मोहाडी प्र.डां ग्रा.पा. हद्दीतील गट नं.१९९ चे जिरायत क्षेत्र ० हे. ४० आर पो.ख. ० हे ६८ आर एकूण क्षेत्र १ हे. ०८ आर आकार ० रु ४५ पैसे भुधारणा पध्दत १ अशी शेतजमीन विक्री करण्याचा सौदा केला ती माझे मालकीची शेतजमीन त्याची चतुसिमा गांव नकाशा प्रमाणे

वर नमुद वर्णन केलेला शेतीजमीन/मिळकत ही श्री.देविदास राजधर भामरे रा. वलवाडी, देवपूर, धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कबजे ताबे उपभोगातील आहे. सदरची मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे. व बयाणा अदा केलेला आहे. सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद शेतजमीन/मिळकतीवर नमुद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांरतण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत आमचे खालील पत्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यांस वरील शेतजमीन/मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहित धरुन आमचे अशिल वर नमूद शेतजमीन/मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे.

धुळे, दि.१७/०८/२०२६.

ॲड.लखमीचंद अ.गुजर
ॲडव्होकेट व नोटरी
ग.नं.२, घर नं.३३२६, मुल्लावाडा, धुळे.
मो.नं.९४२३४९३०८९

जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन- मौजे महिंदळे ता.जि. धुळे येथील स.नं.४०/२ पैकी प्लॉ.नं.१३ चे क्षेत्र ३४४.५० चौ.मी. यास सि.स.नं.११३८ चे क्षेत्र ३५४.४० चौ.मी. सत्ताप्रकार क पश्चिमेकडील भागाचे क्षेत्र १७२.२५ चौ.मी. यापैकी कायम खरेदी देण्याचा सौदा केला ते अविभक्त हिस्याचे क्षेत्र १२९.१९ चौ.मी. यामध्ये २५-३० वर्षे जुने आर.सी.सी. बांधीव मिळकत व उर्वरीत बखळ जागा. यासी चर्तु:सिमा मंजुर ले-आऊट प्रमाणे.

येणे प्रमाणे मिळकतीचे मालक हर्षा विरभान तलरेजा रा. हाऊस नं.१३, झुलेलाल सोसायटी, साक्री रोड, धुळे यांनी आमचे आशिले यांच्यासोबत सौदा केला आहे. सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अँण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमुद पत्यावर पुराव्यानीशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ०७ दिवसानंतर आलेल्या हरकती, लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचाही कोणतेही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे. सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन माझेमार्फत प्रसिध्दीस दिले असे.

ठिकाण- धुळे,
दिनांक:- १५/०८/२०२६.

ॲड.उमेश व्ही.मुसळे
प्लॉट नं.३१, कृष्णा सोसायटी, एकता नगर, नकाणे रोड, देवपूर, धुळे-४२४००२.
मो.नं.८४८३८७०६२८

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे, ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं.३३६/२/२/४ यांस फायनल प्लॉट नं.४६५८ यापैकी प्लॉट नं.२३ चे एकूण क्षेत्र २०७.५ चौ.मी. यापैकी पुर्वेकडील भागाचे

पान १ वरुन

महाकालेश्वरच्या परिसरात चेंगराचेंगरी

पावती देत व्हीआयपी दर्शन

सागरच्या म्हणण्यानुसार, या काळात व्हीआयपी दर्शन सुरू होते. व्हीआयपींना तीनशे रुपयांची पावती देऊन दर्शन दिले जात होते. सागर म्हणाला, मी कालही महाकाल मंदिरात गेलो होतो. कालसुद्धा प्रचंड गर्दीत व्हीआयपींना प्रवेश दिला जात होता. सामान्य लोक मानसरोवर गेटवर चार तास उभे होते. ग्वाल्हेरहून आलेल्या आरती नावाच्या दुसऱ्या एका भक्त महिलेने सांगितले की, या घटनेत तिची मुलगीही जखमी झाली आहे. ती म्हणाली, आम्ही दर्शनासाठी ग्वाल्हेरहून आलो होतो आणि आता आम्ही खूप अस्वस्थ झालो आहोत. तिने पाणी सुद्धा प्यायलेले नाही. ती बोलू शकत नाही. तिचे दात तुटले आहेत. तेथे चेंगराचेंगरी झाली. तिला चक्कर आली आणि ती रेलिंगवर पडली. ती बेशुद्ध झाल्यावर आम्ही तिला रुग्णवाहिकेने रुग्णालयात पाठवले.

बिहार मध्ये चेंगराचेंरीत सात ठार

बिहारमधील लखीसरायमध्ये मंदिरात झालेल्या भीषण चेंगराचेंगरीत सात महिलांचा मृत्यू झाला. या घटनेत बारापेक्षा अधिक लोक जखमी झाल्याचे वृत्त आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. ही घटना अशोकधाम स्टेशन ते मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर घडली. लखीसरायचे जिल्हाधिकारी शैलेंद्र कुमार यांनी सांगितले की, पुरुषांच्या रांगेवर एक खांब पडला. लोकांवर वीजवाहिनी पडल्याची अफवा पसरली होती. पण, प्रत्यक्षात ती एक केबल होती. पुरुषांच्या गर्दीच्या दाबामुळे महिलांच्या रांगेवर दाब पडला, ज्यामुळे त्या एकमेकींवर पडल्या. मृत झालेल्या चौघींची ओळख पटली आहे. मधुबाला देवी, मनमाला देवी, हेमलता देवी आणि मुंगेर येथील रिंकू देवी असून या सर्व लखीसरायच्या रहिवासी होत्या. मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी चार लाख रुपयांची नुकसान भरपाई जाहीर केली आहे.

देशात २५३ जण अटकेत

घातपात व हल्ल्यांचे मनसुबे उधळून लावले. भारतीय सुरक्षा दलांनी चौदा राज्यांमधील विविध ठिकाणी समन्वय साधून कारवाया केल्या आणि हे नेटवर्क उद्ध्वस्त केले. दहशतवादाप्रती भारताच्या शून्य-सहिष्णुतेचे हे एक उत्तम उदाहरण ठरले आहे. या गटाकडून आयएसआयच्या फंडमधून घेतलेले आयईडी स्फोटके, पाकिस्तान ऑर्डनन्स फॅक्टरीची खूण असलेले ग्रेनेड, पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि हेरगिरीसाठी वापरले जाणारे सीसीटीव्ही कॅमेरे यांसारखा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हे नेटवर्क अनेक दहशतवादी कारवायांमध्ये सामील होते, अशी महत्त्वाची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एक्स पोस्टवरून दिली.

चौदा राज्यांमध्ये एकाच वेळी कारवाई

सुरक्षा यंत्रणांनी बारा ऑगस्ट रोजी राज्य पोलिसांसोबत रिअल-टाइम इंटेलिजन्स शेअरिंग सिस्टीमद्वारे ही कारवाई सुरू केली. ही कारवाई उत्तर प्रदेश, हरियाणा, दिल्ली, पंजाब, राजस्थान, महाराष्ट्र, उत्तराखंड, कर्नाटक, गुजरात, बिहार, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर आणि केरळमध्ये करण्यात आली. सर्वाधिक ६२ जणांना उत्तर प्रदेशात, त्यानंतर हरियाणात ५२, दिल्लीत ५१ आणि पंजाबमध्ये ४४ जणांना ताब्यात घेण्यात आले. राजस्थानात १५, महाराष्ट्रात ८ आणि उत्तराखंडात पाच जणांना ताब्यात घेतले. कर्नाटक, गुजरात आणि बिहारमध्ये प्रत्येकी तीन जणांना, तर तेलंगणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर आणि केरळमध्ये प्रत्येकी दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

दागिने लंपास करणाऱ्या चौघांना अटक

कोठडी देण्यात आली. आरोपींच्या पूर्वइतिहासाची तपासणी केली असता काही आरोपींविरुद्ध मुंबईतील विविध पोलीस ठाण्यांमध्ये यापूर्वीही गुन्हे दाखल असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक किशोरकुमार परदेशी, गुन्हे शोध पथकाचे हवालदार रविंद्र आखडमल, अतुल पाटील, योगेश दाभाडे, गोविंद कोळी, विनोद आखडमल, भटू साळुंके, सचिन वाय, प्रशांत पवार, आरिफ तडवी, सोमा ठाकरे, मनोज दाभाडे, मनोज महाजन, वर्षा चौधरी, मोहिनी कोकणे, चित्रा पावरा व होमगार्ड मिथुन पवार यांनी ही कामगिरी बजावली.

सोलर कंपनीतुन केबल चोरणाऱ्या..

हजारांची मोटर सायकल क्र. एमएच१८/बीके-८१०६) असा एकूण १ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. संशयितांनी गुन्ह्यामध्ये वापरलेली मोटरसायकलही जप्त करण्यात आली.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक सुधीर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक किरण बर्गे, प्रियदर्शनी थोरात, उपनिरीक्षक भुषण शेवाळे, शिवराज आंधळे हवालदार नारायण मालचे, रतन मोरे, प्रशांत ठाकुर, प्रदिप आखाडे, खंडेराव पवार, परमेश्वर चव्हाण, श्रीराम पद्मर, दीपक महाले, राकेश महाले, पृथ्वीराज शिंदे, विजय पाटील, कृष्णा भिल, बालाजी पारवाड, रविंद्र सुर्यवंशी टिलु पावरा यांनी कारवाई केली.

स्व.तपनभाई पटेल जयंतीनिमित्त अभिवादन

त्यांनी दिलेले महत्त्व, समाजातील विविध घटकांप्रती असलेली त्यांची बांधिलकी आणि सेवाभावी वृत्ती याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना अवगत करून दिले. समाजासाठी केलेले कार्य आणि इतरांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना हीच व्यक्तीची खरी ओळख ठरते, असा संदेश देत प्राचार्या मंजु सिंह यांनी विद्यार्थ्यांनी स्व. तपनभाई पटेल यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन शिक्षणासोबतच सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवावी, असे आवाहन केले.विद्यार्थ्यांनीही त्यांच्या कार्याविषयी माहिती जाणून घेत समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा घेतली.कार्यक्रमात शाळेतील वातावरण भावपूर्ण झाले होते. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांनी स्व. तपनभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले. त्यांच्या कार्याचे स्मरण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

राजकीय समिकरणांकडे लागले सर्वांचे लक्ष

कोणती नवी राजकीय समीकरणे तयार होणार, तसेच त्यांच्या समर्थकांची पुढील भूमिका काय राहणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची पक्ष नेतृत्वाने गंभीर दखल घेतली असून, नंदुरबारमधील पक्षांतर्गत परिस्थितीचा आढावा घेण्यास सुरुवात झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे आगामी काळात नंदुरबार भाजपच्या संघटनात्मक पातळीवर आणखी काही बदल होणार का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे.

विजय चौधरी यांच्यासारख्या स्थानिक पातळीवरील महत्त्वाच्या नेत्यावर झालेल्या या कारवाईमुळे नंदुरबारच्या राजकारणात मोठी राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आगामी निवडणुका आणि पक्षातील संघटनात्मक बांधणीच्या पार्श्वभूमीवर या हकालपट्टीचे परिणाम किती दूरगामी ठरतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

गिरीश महाजन व भरत गोगावले

होते. अखेर ही जबाबदारी भरत गोगावले यांच्याकडे सोपवण्यात आली. नाशिकच्या पालकमंत्रीपदासाठी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात चुरस होती. अखेर नाशिकची धुरा गिरीश महाजन यांच्याकडे कायम ठेवण्यात आली आहे. नुकतेच भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट २०२६ रोजी नाशिकमध्ये गिरीश महाजन यांच्या हस्ते विभागीय आयुक्त कार्यालय व शासकीय ठिकाणी मुख्य ध्वजारोहण करण्यात आले होते. तर रायगडमध्ये मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

निधन वार्ता

मंगला कुंकारी

धुळे, दि.१७- साक्री रोड परिसरातील अंजिक्यतारा सोसायटीयेथील रहिवासी मंगला अशोक कुंकारी यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्या सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक अशोक कुंकारी यांच्या पत्नी होत.व एस आर पी चे जवान किरण कुंकारी यांची मातोश्री होत.

केशवराव नांदेडकर



धुळे, दि.१७- धुळे येथील रहिवासी, स्टेट बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त अधिकारी, केशवराव नांदेडकर पुण्यात निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्यावर पुण्यात वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. आशुतोष नांदेडकर व अनघा आठल्ये यांचे ते वडील होत.

पुनम वडनेरे

धुळे, दि.१७- साक्री रोड परिसरातील विद्यावर्धीनी कॉलेज जवळील रहिवासी पूनम शरदराव वडनेरे हृदय विकाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ५९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, असा परिवार आहे. त्या जिल्हा रुग्णालय धुळे येथील सेवानिवृत्त परिचारिका होत्या. त्या एल.आय.सी.धुळे शाखेचे विकास अधिकारी शरद वडनेरे यांच्या पत्नी व धुळे महापालिकेतील निवृत्त अधिकारी मधुकर वडनेरे यांच्या भावजय होत.

किरण शेटे

धुळे, दि.१७- चितेनगर उपनगर नंदुरबार येथील रहिवासी किरण सुपडू शेटे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई,वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, असा परिवार आहे. ते सुपडू विठ्ठल शेटे यांचे जेष्ठ सुपुत्र होत.

वंदे मातरम बद्दल काँग्रेसला शिकवू नये अपप्रचार थांबवावा; सपकाळांचे खडे बोल

मुंबई, दि.१७- वंदे मातरम राष्ट्रगितावरून भारतीय जनता पक्ष राजकारण करत आहे हे अत्यंत हास्यास्पद आहे. वंदे मातरम हे १८९६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात पहिल्यांदा गायले गेले व तर २४ जानेवारी १९५० रोजी ते देशाचे राष्ट्रीयगीत म्हणून स्वीकारण्यात आले. गुरुदेव रविंद्रनाथ टागोर, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस, मौलाना आझाद यांच्या उपस्थितीत याचा निर्णय झालेला असून काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात व कार्यक्रमात ते गायिले जाते. भारतीय जनता पक्षाकडून एक व्हिडिओ प्रसारित करून काँग्रेसविरोधात अपप्रचार केला जात आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांना जास्त वेळ उभा राहता येत नाही ये लक्षात घेऊन सोनिया गांधी काही सुचना करत आहेत परंतु भाजपा कडून मात्र वंदे मातरमचा अपमान केल्याचा अपप्रचार केला जात आहे, हा अपप्रचार थांबवावा. वंदे मातरम बद्दल भाजपाने काँग्रेसला शिकवण्याची गरज नाही. असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

उत्तर भारतीय बिहारी फ्रँटचे नेते व शेकडो कार्यकर्त्यांनी आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख

उपस्थितीत टिळक भवन मधील एका कार्यक्रमात काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी उत्तर प्रदेशचे काँग्रेस प्रभारी राजेंद्र पाल गौतम, उदित राज, प्रदेश सरचिटणीस राणी अग्रवाल यांच्यासह पदाधिकारी उपस्थितीत होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी सर्वांचे काँग्रेस परिवारात स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

उत्तर भारतीय समाज मुंबईसह राज्याच्या प्रत्येक भागात रहात असून महाराष्ट्राच्या प्रगतीत त्यांचेही योगदान आहे. हा समाज काँग्रेस पक्षासोबत नेहमी खंबीरपणे उभा राहिला व काँग्रेस पक्षानेही उत्तर भारतीयांना मुंबई व महाराष्ट्रात विविध पदांवर काम करण्याची संधी दिली आहे. राहुल गांधी यांच्या रुपाने काँग्रेस पक्षाला एक कणखर नेतृत्व लाभले असून त्यांच्या पाठीशी सर्वांनी उभे राहिले पाहिजे. काँग्रेस संघटना मजबूत करून देशात व राज्यात पुन्हा काँग्रेसचे सरकार आणण्यासाठी प्रयतक करा, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

उत्तर प्रदेशचे काँग्रेस प्रभारी राजेंद्र पाल गौतम यावेळी म्हणाले की, देशात पूर्वी सर्वसामान्य लोकांना मतदानाचा अधिकार नव्हता पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गोलमेज परिषदेत मतदानाचा हक्क सर्वांना देण्याचा मुद्दा मांडला व साली कायदा बनला, त्यानुसार सर्वसामान्य समाजातील घटकांना तसेच महिलांनाही मतदानाचा अधिकार मिळाला आणि साली झालेल्या निवडणुकीत सर्वांनी मतदानाचा हक्क बजावला. ज्यांना आपल्या पूर्वजांचा इतिहास माहित नाही ते इतिहास घडवू शकत नाहीत म्हणून स्वातंत्र्याची लढाई कोणाच्या नेतृत्वाखाली लढली हे माहित असले पाहिजे. काही लोकांना वाटते स्वातंत्र्य साली मिळाले त्यांना हे माहित हवे की स्वातंत्र्याची लढाई काँग्रेसच्या नेतृत्वाखाली लढली गेली, या लढाईत हजारो लोकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, जेलमध्ये गेले, लाठ्या काठ्या अंगावर घेतल्या. देश स्वतंत्र झाला त्यावेळी भारत गरिब देश होता पण काँग्रेसच्या सरकारांनी विकासाची एक एक शिखरे उभी केली पण आजचे सरकार ते सर्व विकत आहे. आज जे लोक सत्तेत आहेत त्यांनी समाजात जाती धर्माच्या नावावर विष पेरले आहे. समाजात विष पेरणाऱ्यांना आता सत्तेतून खाली खेचण्याची वेळ आली आहे असे ते म्हणाले.

यावेळी उदित राज म्हणाले की, मुंबईसह महाराष्ट्रात उत्तर भारतीय समाज मोठ्या प्रमाणात आहे. उत्तर भारतीयांना काँग्रेसने नेतृत्व करण्याची संधी दिली, मंत्री, आमदार व खासदार बनवले. काँग्रेसला तुमची व तुम्हाला काँग्रेसची गरज आहे. देशात धर्मनिरपेक्ष पक्ष हा फक्त काँग्रेस पक्ष आहे आणि सरकारला जाब विचारणारा नेता फक्त राहुल गांधी हे आहेत. आता भाजापच्या सत्तेचे काऊंटडाऊंन सुरु झाले असून काँग्रेसचे सरकार लवकरच देशात येणार आहे, असा विश्वास उदित राज यांनी व्यक्त केला.

आदिवासी समाज बांधवांचा परंपरागत साजरा केला जाणारा पंचमी सण

पिंपळनेर,दि. १७- (प्रतिनिधी)- आदिवासी समाजात आदिवासी कोकणी,कोकणा समाजात पंचमीला एक वेगळंपण आहे.ते या समाजातील आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा होत असलेल्या विशिष्ठ परंपरेमुळे अगदी जुन्या काळापासून पिढीजात आणि परंपरागत हा सण कोकणी,कोकणा समाजात साजरा केला जातो.या समाजातील लोक मुळातच निसर्ग पूजक असल्याने पंचमीला विशेष महत्त्व आहे. विशिष्ट ठिकाणी घरातील भिंतीवर विविध प्राण्यांच्या चित्रांची पूजा केली जाते.या दिवशी चुलीच्या जवळील भिंतीवर शेणाने सारवून विविध चित्रांचा आराखडा बांबूची बारीक काडी किंवा पिसांची कुंचली (ब्रश) वापरून रेखाटली जातात.

या मध्ये गाय,बैल,शेळी,नाग, वाघ,सिंह,औत, मानवी साखळी, झाडे,घर,चंद्र,सूर्य,तारे,पाऊस,साप, विंचू,आणि पाळीव प्राण्यांचे रेखाटन केले जाते.खरं म्हणजे संपूर्ण समाज निसर्ग,प्राणी पूजक असल्याचे हे द्योतकच आहे. चित्रे काढणे एवढंच या दिवसाचं महत्व नसून,यात संपूर्ण चित्ररूपी निसर्ग देवतांचे पूजन देखील या दिवशी केले जाते.चित्र काढताना जुन्या काळात नैसर्गिक पांढरा रंग तयार करून वापरला जाई परंतु सध्या बाजारात चुना सहज उपलब्ध होत असल्याने चुन्याचा वापर चित्र काढण्यासाठी होत असल्याचे अलीकडे दिसून येते. कोकणी कोकणा समाजात अशा अनेक निसर्ग पूजनीय प्रथा आढळून येतात. त्यापैकीच ही एक होय. आदिवासी समाजात कोकणी, कोकणा समाजात प्रत्येकाच्या घरात या दिवशी गोड-धोड पदार्थ (कान्होळे) बनवले जातात.यानंतर संध्याकाळी घरात चुलीजवळ भिंतीवर शेणाने सारवून त्यावर पांढऱ्या रंगाने किंवा चुन्याने चित्र काढलेल्या ठिकाणी धान्य,पाणी वगैरे ठेऊन भिंतीवर काढलेल्या विविध चित्रांची पूजा करतात,आणि त्यानंतर गोड गोड जेवण तयार करून पंचमीला नैवद्य दाखवितात.

पाहिजेत
रेडिमेड दुकान कामासाठी हुशार, मुले पाहिजेत. आकर्षक पगार
-: त्वरीत भेटा :-
श्री सत्यनारायण ड्रेसेस
ग. नं. २, जैन मंदिराजवळ, धुळे फो. नं. २३६४८५

पान १ वरुन

ड्रोन तंत्रज्ञानाचा उपयोग करणार

गुन्हेगारी नियंत्रण, सण उत्सव काळात निघणाऱ्या मिरवणुकीवर तथा अन्य कार्यक्रमावर नियंत्रण असे अनेक हेतू यातून साध्य होतील. रेवाज एनर्जी आणि सेरेब्रोस्पर्क या संस्थानी ड्रोन प्रशिक्षण सारखे उपक्रम नंदुरबार जिल्ह्यात सुरू करणे कौतुकास्पद आहे आणि यातून जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल असे प्रतिपादन त्यांनी केले.

याप्रसंगी व्यासपीठावर नंदुरबार जिल्ह्याचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक आशित कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक कडलग, कल्याण शाखा पोलीस निरीक्षक विवेक पाटील, विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक विश्वास पावरा, शहर वाहतूक शाखेचे प्रमुख जगदीश गावित, पश्चिम खांदेश भिल्ल सेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ.सुहास नटावदकर, सुहासिनी नटावदकर, रेवाज एनर्जी चे संचालक रोहन नटावदकर, जयदीप नटावदकर, सेरेब्रोस्पर्क चे प्रकल्प व्यवस्थापक विवेक शिरसाठ, विद्यालयाचे मुख्याध्यापक धर्मेंद्र मराठे , नितीन पाटील यांच्यासह प्रशिक्षणार्थी पोलीस व विद्यार्थी तसेच शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला रिमोट कंट्रोल च्या सहाय्याने दीप प्रज्वलन करण्यात आले. याचे आयोजन मिलिंद वडनगरे यांनी केले.सेरेब्रोस्पर्क चे संचालक ऋषिकेश सोनवणे यांनी सांगितले की संस्था २०२० मध्ये स्थापन झाली. त्यानंतर संरक्षण, पोलीस, कृषी, शिक्षण अश्या अनेक क्षेत्रात ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सेवा पुरवित आहे. त्यांनी ड्रोन चे प्रात्यक्षिक सुद्धा दाखवले. हे तंत्रज्ञान मानवी जीवन सुलभ करते आहे, समाजाच्या विविध क्षेत्रात त्यासाठी आम्ही मदत करू अशी ग्वाही त्यांनी दिली. हे प्रशिक्षण ७ दिवस चालणार असून यात थियरी व प्रात्यक्षिक दोन्हींचा समावेश आहे. सूत्रसंचालन संतोष पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन उपमुख्याध्यापक डॉ.गिरीश पवार यांनी केले.

संगणक प्रशिक्षण शिबिराला सुरुवात

यावेळी अब्दूलखालिक फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष खलीक जसीम शेख यांनी प्रशिक्षणाची माहिती दिली. आजच्या काळात आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढत असून, युवकांना त्याची योग्य माहिती व प्रत्यक्ष वापराचे ज्ञान मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशिक्षणाचे प्रशिक्षक आजम तेली असून, दहा दिवसांत ची मूलभूत माहिती, जनरेटिव्ह एआय , विविध साधने, संगणक कौशल्ये, डिजिटल साधनांचा वापर तसेच एआय चा सुरक्षित व जबाबदारीने वापर याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

यावेळी संजय बलोलकर, स्वप्नील गोडे आणि महेंद्र काटे यांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधून प्रशिक्षणात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विपिन भावसार यांनी केले. या उपक्रमासाठी फाउंडेशनचे साकिब शाह, अल्तमश बगवान, गुफरान अंसारी, फैजान शाह, सोहेल बगवान, सफ़वान पठान, मुजाहिद शेख, आजम मिर्झा, रिजवान अंसारी, शोएब अंसारी आणि नोमन मंसूरी यांनी सहकार्य केले. दहा दिवसांच्या या प्रशिक्षणातून युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळून त्यांच्या कौशल्य विकासाला व भविष्यातील करिअरच्या संधींना मदत होणार असल्याचे फाउंडेशनच्यावतीने सांगण्यात आले.

केबल्स हटविण्याची महापालिकेची मोहीम

भागांत ही मोहीम सातत्याने राबविण्यात येणार आहे. शहरातील सार्वजनिक रस्ते, विद्युत खांब व इतर सार्वजनिक ठिकाणी केबल्स अस्ताव्यस्तपणे टाकल्यामुळे नागरिकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होण्यासोबतच शहराच्या सौंदर्याला ही बाधा पोहोचते. त्यामुळे सर्व संबंधित केबलधारक कंपन्या, इंटरनेट सेवा पुरवठादार व डिश सेवा पुरवठादारांनी रस्त्याच्या मध्यभागी अथवा सार्वजनिक ठिकाणी असलेल्या केबल्स स्वतःहून काढून त्या सुव्यवस्थित पद्धतीने टाकाव्यात, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

महानगरपालिकेच्या सूचनेनंतरही अनधिकृत अथवा अस्ताव्यस्त केबल्स न हटविल्यास त्या महानगरपालिकेच्या यंत्रणेमार्फत काढून टाकण्यात येतील. तसेच संबंधितांविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही महानगरपालिकेने दिला आहे. शहराचे सौंदर्य, सार्वजनिक रस्त्यांची सुरक्षितता आणि नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने सर्व संबंधितांनी महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

Requirements:
Position : District Sales & Marketing Executive
- Experience in AAC Blocks/Construction Material/Cement Industry
- Own Two-Wheeler & Valid Driving Licence
- Strong Sales & Customer Handling Skills
- Ability to Achieve Sales Targets

Location : Dhule District
Salary : Attractive+Incentive
Contact/WhatsApp: 9226817232

विकणे आहे
2 BHK Flat विकणे आहे.
मोहाडी रोड, पेट्रोल पम्पाजवळ, धुळे
शासकीय डेअरी समोर, समता नगर, धुळे
-:Broker:-
L.G. Property
मो. 9793093955

पाहिजेत
लॉजिंगसाठी अनुभवी व ज्ञान असलेले मॅनेजर पाहिजेत. वय ५५ रात्री साठी
-: संपर्क :-
हॉटेल प्रितम पॅलेस
साक्री रोड, महापालिके समोर धुळे
मो. 9423613000

शेती विक्री
भाडणे शिवार, स. नं. ५४४/१, साक्री - पिंपळनेर रोड, नागाईकडे जाणारा रस्ता कॉर्नर येथील ९१ आर शेत विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क साधावा.
-: संपर्क :-
मो. 9850195001
9823189430

पाहिजेत
अनुभवी स्टाफ भरणे आहे.
१. आर.एम.ओ. (MBBS/BAMS/BHMS/BUMS)- २
२. कॉम्प्युटर ऑपरेटर- २
३. नर्सिंग स्टाफ (सिस्टर/ब्रदर)-४
४. रिसेप्शनिस्ट- २
५. वॉर्डबॉय- २
६. वॉचमन- २
अर्जासह समक्ष भेटणे वेळ दुपारी १ ते ३
निरायम हॉस्पिटल
व श्वास क्रिटिकल केअर व सिटी स्कॅन सेंटर, ८० फुट रोड, धुळे

पाहिजेत
हुशार व अनुभवी सेल्स मैन पाहिजे. ॲण्ड अकाऊन्टंट पाहिजे Tally Oprater
-: संपर्क :-
साईबाबा रेडीमेड ॲण्ड होजीअरी
गल्ली नं. २, मुल्लावाडा रोड, अकबर चौक, धुळे
मो. 9422286958
7350148955

भाड्याने/विकणे
शैक्षणिक क्लासेस चालू असलेली, 6000 Sq.feet चांगले बांधकाम असलेली जागा भाड्याने अथवा क्लासेस सहित विकणे आहे.
-: संपर्क :-
8055401841

दुकान भाड्याने देणे
आग्रा रोड, बॉम्बे लॉजजवळ, मुरलीधर भाईजी मार्केट मधील १२X१२ दुकान भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
मो.9422296273

घरभाड्याने देणे
साक्री रोड, पद्मनाभनगर मधील सर्व सोईंनी युक्त 2 BHK घर भाड्याने देणे आहे
-: संपर्क :-
मो.9422296273

जागा भाड्याने देणे आहे
खोलगल्ली कस्तुरबा गांधी रोड कमल पुस्तकालय समोरील पहिला मजला सर्व सोयींनी युक्त ६२५ स्क्वेयर फुट जागा ऑफिस, डॉक्टर, लॅब यांना भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9822357707

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer
Godrej LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
JAPAN PREMIUM

0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES
*नियम व अटी लागू
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०